

नेत्यांची खाज... (पान ४ वर)

आपलं
# नवे शहर
वाचकांच्या मनातील वृत्तपत्र




ठाणे, नवी मुंबई, मिरा भाईंदर, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, पनवेल, उरण | वर्ष: ३३, अंक : ७, मूल्य: २ रुपये, पाने: ६, शनिवार, ९ मे २०२६ • आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र. ६१७९२/९४

# दहावीचा निकाल जाहीर; राज्याचा टक्का ९२.०९

## यंदाही मुलींनीच मारली बाजी; पुन्हा कोकण विभाग अव्वल

**मुंबई** : बारावी निकालानंतर लाखो पालक-विद्यार्थ्यांना प्रतिक्षा असलेला 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक-उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ'च्या दहावी परीक्षेचा निकाल अखेर ८ मे रोजी अधिकृतपणे ऑनलाईन जाहीर करण्यात आला. यंदा राज्याचा निकाल ९२.०९ टक्के लागला असून दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याच्या निकालाच्या टक्केवारीत मुलांपेक्षा सरस कामगिरी करत मुलींनीच वर्चस्व गाजवले आहे. विभागीय निकालात कोकण विभाग अव्वल ठरला आहे. तर छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल सर्वात कमी लागला आहे.

'महाराष्ट्र राज्य माध्यमिक-उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ'कडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत घेण्यात आली.



**विभाग निहाय निकाल**

| | |
|---|---|
| कोकण | ९७.६२ टक्के |
| कोल्हापूर | ९५.४७ टक्के |
| मुंबई | ९४.९७ टक्के |
| पुणे | ९४.२४ टक्के |
| नाशिक | ९०.५३ टक्के |
| अमरावती | ९०.५० टक्के |
| नागपूर | ८९.०७ टक्के |
| लातूर | ८८.४२ टक्के |
| संभाजीनगर | ८८.४१ टक्के |

**निकालाची वैशिष्ट्ये :**
• मुलींची टक्केवारी ९४.९६ टक्के, • मुलांची टक्केवारी: ९०.५६ टक्के, • ४,३१,१६४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, • ३,८०,४३७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण, • १,३४,१३४ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण, • ६,६१२ शाळांचा निकाल १०० टक्के.

यंदा दहावीचा निकाल ९२.०९ टक्के इतका लागला असून ८४.९६ टक्के इतक्या मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

बारावीप्रमाणेच राज्याचा दहावीचा निकाल घसरला आहे. गतवर्षीपेक्षा दहावीचा निकाल २ टक्क्यांनी घसरला आहे. कोकणचा निकाल सर्वाधिक

(उर्वरित पान २ वर)

## नवी मुंबईचा निकाल ९६.२७ टक्के

**नवी मुंबई** : दहावी परीक्षेच्या जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार नवी मुंबई महापालिका हद्दीतील शाळांचा एकूण सरासरी निकाल ९६.२७ टक्के इतका लागला आहे. याशिवाय नवी मुंबईमधील ४४ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

यंदा दहावी बोर्डाच्या परीक्षेसाठी नवी मुंबईतून १५,३०५ विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली होती, त्यापैकी १५,२६७ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले. यामधून एकूण

(उर्वरित पान २ वर)

# नमुंमपा शाळांचा निकाल ९२.१९ टक्के

## सानपाडा शाळेचा विद्यार्थी अभिराम राऊत महापालिका शाळांमध्ये सर्वप्रथम

**नवी मुंबई** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक-उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ८ मे रोजी जाहीर झाला आहे. या परीक्षेत नवी मुंबई महापालिका संचालित २३ माध्यमिक शाळांमधून २४९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महापालिकेच्या २३ शाळांपैकी माध्यमिक शाळा क्रमांक-१२० दिवा (काचेची शाळा) या शाळेचा १०० टक्के निकाल लागलेला आहे.

नमुंमपा शाळेतील २७०३ विद्यार्थी माध्यमिक शालांत



अभिराम मनोजकुमार राऊत | रिया राकेश कहार | श्रावणी संदीप गालवे

परीक्षेमध्ये सहभागी झाले होते, त्यापैकी २४९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, एकूण निकाल ९२.१९ टक्के इतका लागलेला आहे. यामध्ये नमुंमपा शाळा क्र.११६ सानपाडा (मराठी माध्यम) मधील विद्यार्थी अभिराम मनोजकुमार राऊत ९४.४० टक्के गुण संपादन करुन नवी मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये सर्वोत्तम गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. त्याचप्रमाणे नमुंमपा शाळा क्र.१२०, दिवा ऐरोली (इंग्रजी माध्यम) मधील विद्यार्थिनी रिया राकेश कहार ९३.४० टक्के गुण संपादन करुन नमुंमपा शाळांमधून द्वितीय तसेच श्रावणी संदीप गालवे शाळा क्र.११८ पावणे (मराठी माध्यम) शाळेतील विद्यार्थिनी ९३.२० टक्के गुण संपादन करुन नमुंमपा शाळांतून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमिक शाळांमधून गुणानुक्रमे पहिल्या तीन क्रमांकाने यशवंत झालेल्या या विद्यार्थ्यांप्रमाणेच

(उर्वरित पान २ वर)

# ठामपा शाळांचा दहावी निकाल ७८.५५ टक्के

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या माध्यमिक शाळांचा एसएससी परीक्षेचा एकूण निकाल ७८.५५ टक्के लागला आहे. महापालिकेच्या २३ माध्यमिक शाळांमधील एकूण १४२४ विद्यार्थी दहावीला होते. त्यापैकी एकूण १४०८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ११०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले झाले आहेत. बाळकुम येथील शाळा क्र.४, किसननगर येथील शाळा क्र.५, सावरकरनगर येथील शाळा क्र.१६ या तीन शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महापौर शर्मिला पिंपळोलकर, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अभिनंदन केले आहे.

ठाणे महापालिकेच्या मराठी माध्यमाचा निकाल ७४.०५ टक्के, उर्दू माध्यमाचा ८०.९६ टक्के, इंग्रजी माध्यमाचा ९०.९० टक्के तर हिंदी माध्यमाचा निकाल ६८.१८ टक्के लागला आहे. तर रात्रशाळा (मराठी) चा निकाल ६४.७० टक्के इतका लागला आहे.



## आयुशी पाटील महापालिका शाळांमध्ये प्रथम

**ठामपा शाळांमधील पहिले ५ विद्यार्थी...**

शाळा क्र.५ ची आयुषी युवराज पाटील हिने ८९.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. शाळा क्र.१५ चा हर्ष यादव आणि शाळा क्र.८ चा मंतशा मोमीन खान यांनी प्रत्येकी ८९.६० टक्के द्वितीय क्रमांक मिळविला. शाळा क्र.१५चा प्रतिक पवार याने ८९.४० टक्के गुण मिळवत चौथा क्रमांक पटकावला. तर शाळा क्र.१५ ची दिक्षिता माळी आणि ओम यादव यांनी प्रत्येकी ८८.२० टक्के गुण मिळवत संयुक्तपणे पाचवा क्रमांक मिळविला.

दरम्यान, सदर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अतिरिक्त आयुक्त-१ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त-२ प्रशांत रोडे, उपायुक्त (शिक्षण) डॉ. मिताली संचेती यांनी अभिनंदन केले असून शिक्षक आणि पालकांचेही कौतुक केले आहे.

# जीव धोक्यात घालून सफाई कामगारांकडून नालेसफाई

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या मध्यम छोट्या स्वरुपाच्या गटार नालेसफाई कामांचा १० प्रभागनिहाय नुसार प्रत्येकी १० लक्ष याप्रमाणे सुमारे १ कोटी रुपयांच्या कामाची निविदा प्रक्रिया अद्याप देखील मार्गी लागल्या नसल्याने छोट्या मध्यम स्वरुपाच्या गटारे-नालेसफाई कामासाठी महापालिका सफाई कर्मचाऱ्यांवर ताण आला आहे. या सफाई कर्मचाऱ्यांकडे यंत्रसामुग्री तसेच सुरक्षा साधनांचा अभाव पाहता त्यांच्यावर जीव धोक्यात घालून काम करण्याचा प्रसंग ओढावला आहे.

पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर मध्यम छोट्या स्वरुपाच्या गटारे, नालेसफाई कामासाठी निविदा प्रक्रिया सुरु असून प्रभागनिहाय १० पैकी ५ कामांच्या निविदा प्रक्रियांमध्ये ठेकेदारांनी प्रतिसाद न दिल्यामुळे फेरनिविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. त्यामुळे सदर कामे मार्गी लागू न शकल्यामुळे छोट्या, मध्यम स्वरुपाच्या गटार,



नालेसफाईसाठी कंत्राटी कामगार अजून न आल्याने महापालिकेतील कायमस्वरुपी कामगारांना गटारे साफ करावी लागत आहेत. त्यातच साफसफाईसाठी यंत्र सामुग्री नसल्याने कामगारांना जीव धोक्यात घालून नाल्यात उतरावे लागत आहे. याचा प्रत्यय सहजानंद चौक

(उर्वरित पान २ वर)

## दहावी निकालः अंबरनाथमधील विविध शाळांकडून यशाची परंपरा कायम

**अंबरनाथ** : 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक-उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ'च्या वतीने घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, अंबरनाथमधील विविध शाळांनी आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. शहरातील शिवाजी आबाजी कोळकर विद्यालय, भाऊसाहेब परांजपे विद्यालय, महात्मा गांधी विद्यालय आणि श्रीमती सुहासिनी प्रभाकर अधिकारी माध्यमिक विद्यालय या शाळांमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

शिवाजी आबाजी कोळकर विद्यालयात तेजल प्रवीण पाटील



हिने ९५ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच भक्ती अजय ठाणेकर ९३.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर रुद्र प्रकाश परब ९०.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. दि एज्युकेशन सोसायटी संचालित भाऊसाहेब परांजपे विद्यालयाचा

(उर्वरित पान ३ वर)

## २ अल्पवयीन मुली बेपत्ता

**भिवंडी** : तालुक्यातील २ वेगवेगळ्या भागातून अल्पयवीन मुलींचे अपहरण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. याप्रकरणी २ पोलीस ठाण्यामध्ये अज्ञातांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील पहिल्या घटनेत शहर पोलिस ठाणे हद्दीतील नवी वस्ती परिसरातील १७ वर्षीय मुलगी ३ मे रोजी सकाळी ११.३०च्या सुमारास घरात काही एक न सांगता निघून गेली असता घरी परतलीच नाही. त्यामुळे तिचे कोणीतरी अज्ञाताने फुस लावून पलायन केल्याच्या संशयावरुन अज्ञाताच्या विरोधात

(उर्वरित पान ३ वर)



# ६४ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना ठाणे महापालिकेत नोकरी

**ठाणे** : ठाणे महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसातत्त्वावर महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत तसेच त्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी प्रशासनासोबत सातत्याने पाठपुरावा करुन संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने सन मे २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत सेवानिवृत्त

### महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान

झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या ६४ वारसांना महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहेत. यापैकी प्रतिनिधीक स्वरुपात १० जणांना महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

याप्रसंगी उपमहापौर कृष्णा पाटील, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, शिवसेना गटनेते पवन कदम, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप तसेच आस्थापना अधीक्षक राधिका कांबळे उपस्थित होते.

सफाई कर्मचाऱ्यांचा वारसा हक्क आणि अन्य प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महापौर पिंपळोलकर यांनी प्रशासनासोबत विशेष बैठक

(उर्वरित पान ३ वर)

## ठाण्याचे जावई दीपांजन चक्रवर्ती घेणार मंत्रिपदाची शपथ

**ठाणे** : ठाणे जिल्ह्याचे जावई आणि ठाणे शहरातील प्रसिध्द 'हिरानंदानी इस्टेट'चे रहिवासी दीपांजन चक्रवर्ती यांनी पश्चिम बंगालच्या राजकारणात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत त्यांनी आमदार म्हणून दणदणीत विजय मिळवला असून, आता त्यांची वर्णी थेट राज्याच्या मंत्रिमंडळात लागणार आहे. पश्चिम बंगालच्या संभाव्य १५ मंत्र्यांच्या यादीत दीपांजन चक्रवर्ती यांच्या नावाचा समावेश करण्यात आला असून आज ९ मे रोजी त्यांचा शपथविधी पार पडणार आह.

दीपांजन चक्रवर्ती मुळचे पश्चिम बंगालचे असले तरी त्यांचे ठाणे शहराशी घट्ट नाते आहे. ठाणे जिल्ह्याचे जावई असलेले चक्रवर्ती ठाण्यातील हिरानंदानी इस्टेटमध्ये वास्तव्यास आहेत. एका बाजुला ठाणेतील कॉर्पोरेट आणि सुशिक्षित वातावरण आणि दुसऱ्या बाजुला पश्चिम बंगालमधील जमिनीवरची निवडणूक, अशा दोन्ही पातळ्यांवर त्यांनी आपली छाप पाडली.

२०२६ च्या या विधानसभा निवडणुकीत दीपांजन चक्रवर्ती यांनी 'भाजपा'तर्फे निवडणूक लढवली. त्यांनी उत्तरपाडा विधानसभा मतदारसंघातून तृणमूल काँग्रेस आणि डाव्या आघाडीच्या उमेदवारांना पराभूत करत विजय संपादन केला.

## ९ वर्षाच्या विद्यार्थिनीचा विनयभंग; कराटे प्रशिक्षक जेरबंद

**कल्याण** : कराटे शिकवण्याच्या नावाखाली ९ वर्षांच्या विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याचा आरोप कराटे प्रशिक्षकावर करण्यात आला आहे. सदर घटना महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून, त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली आहे.

आरोपी कराटे प्रशिक्षक गिरीश वाघमारे याच्यावर त्याच्या प्रशिक्षण वर्गात येणाऱ्या विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. सदर घटना उघडकीस आल्यानंतर

(उर्वरित पान २ वर)

## रुग्णालयात तोडफोड अन् डॉक्टरला धक्काबुक्की; तिघांविरुध्द गुन्हा

**उल्हासनगर** : शासकीय कामात अडथळा निर्माण करुन रुग्णालयातील मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकारणी उल्हासनगरमधील मध्यवर्ती पोलीस ठाण्यात तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना ७ मे रोजी मध्यरात्री १ ते २ च्या सुमारास मध्यवर्ती शासकीय रुग्णालयातील अपघात विभागात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. ममता पाण्डेय (३५) या रात्रीच्या वेळी अपघात विभागात मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून ड्युटीवर तैनात होत्या. त्यावेळी उपचार सुरु असताना भगवान लिंबोरे नावाच्या व्यक्तीचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मृताचे नातेवाईक आशा लिंबोरे, मंगेश



लिंबोरे आणि शुभम लिंबोरे (सर्व रा.म्हारळगाव, ता.कल्याण) यांनी संताप व्यक्त करत अपघात विभागात गोंधळ घातला.

आरोपींनी रुग्णालयातील वैद्यकीय वस्तुंची तोडफोड

(उर्वरित पान ३ वर)

# 'अंबरनाथ'च्या राजकीय लढाईत 'शिवसेना महाविकास आघाडी'चा विजय

**अंबरनाथ** : 'अंबरनाथ नगरपरिषद'मधील गट वैधतेच्या बहुचर्चित कायदेशीर लढाईचा निकाल अखेर जाहीर झाला असून जिल्हाधिकाऱ्यांनी शिवसेना-महाविकास आघाडी गटाला वैध ठरवले आहे. या निर्णयामुळे 'भाजपा'ला मोठा राजकीय धक्का बसला असून 'राष्ट्रवादी काँग्रेस'च्या अश्विनी सचिन पाटील यांची स्वीकृत नगरसेविका म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. ५ आणि ६ मे रोजी निकालाबाबत अनिश्चितता असल्याने शहरात विविध चर्चांना उधाण आले होते. मात्र, या निकालाने आता राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे.

'अंबरनाथ नगरपरिषद'मध्ये 'भाजपा'च्या नगराध्यक्षा थेट

## जिल्हाधिकाऱ्यांकडून गट वैधतेवर शिक्कामोर्तब



निवडून आल्या असल्या तरी उपनगराध्यक्ष आणि सभापती पदासाठी ३० सदस्यांच्या बहुमताची आवश्यकता होती. सुरुवातीच्या समीकरणानुसार 'शिवसेना शिंदे गट'कडे एका अपक्षासह २८ सदस्य होते, तर 'भाजपा'कडे स्वत:चे १५, 'काँग्रेस'मधील निलंबित गटाचे १२ आणि 'राष्ट्रवादी'चे ४ असे एकूण ३१ सदस्यांचे पाठबळ होते. संख्याबळ अनुकूल असल्याने उपनगराध्यक्षपद 'भाजपा'कडे जाण्याचे निश्चित मानले जात असतानाच 'राष्ट्रवादी'चे ४ नगरसेवक शिवसेना गटात सामील झाल्याने मोठा राजकीय बदल घडला.

या घडामोडीमुळे 'शिवसेना'चे संख्याबळ ३२ वर पोहोचले आणि 'भाजपा'च्या हातातून उपनगराध्यक्षपद निसटले. यानंतर कोणता गट अधिकृत आहे, याबाबत 'भाजपा'ने जिल्हाधिकाऱ्यांकडे याचिका दाखल केली होती, ज्याला 'शिवसेना'ने देखील कायदेशीर प्रत्युत्तर दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही बाजुंची सुनावणी पूर्ण केल्यानंतर

(उर्वरित पान ३ वर)

# उलवेतील निर्घृण हत्याकांडाचा निकाल

**आरोपीला जन्मठेप, दंड**

**नवी मुंबई** : उलवे येथे वृध्द व्यक्तीची निर्घृण हत्या करुन त्यांच्या पत्नीवर जीवघेणा हल्ला करीत घरातील ऐवज लुटणाऱ्या आरोपी संदीप गुप्ता याला पनवेल जिल्हा-सत्र न्यायाधीश एस. आर. उगले यांनी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेसह ५० हजार रुपये दंड आणि विविध कलमान्वये दोन वेळा ७-७ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

या घटनेतील मृत रामप्रसाद गुप्ता आणि त्यांची पत्नी लक्ष्मीदेवी उलवे, सेक्टर-२३ मधील के. के. लँडमार्क या इमारतीत राहत होते. आरोपी संदीप गुप्ता रामप्रसाद यांच्या सुनेचा भाऊ आहे. संदीपने रामप्रसाद यांच्याकडून ७० हजार रुपये उसने घेतले होते. सदर पैसे रामप्रसाद परत मागत असल्याने, त्याचा राग मनात धरुन चोरीच्या उद्देशाने २२ एप्रिल २०१८ रोजी संदीप त्यांच्या घरी गेला होता. लक्ष्मीदेवी चहा बनवण्यासाठी स्वयंपाकघरात गेल्या असताना, संदीपने रामप्रसाद यांना बेडरुममध्ये नेऊन चाकुने वार करत त्यांची हत्या केली. त्यानंतर त्याने लक्ष्मीदेवी यांच्या गळ्यावरही वार करुन त्यांना बाथरुममध्ये फेकले होते. त्यानंतर त्याने कपाटातील ९ तोळे दागिने आणि ८० हजार

(उर्वरित पान ३ वर)

# 'एपीएमसी'च्या स्वच्छतेसाठी महापालिकेचा पुढाकार; आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी

## नाशवंत कचऱ्याचे तातडीने संकलन करा; आयुक्त डॉ. शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई** : मुंबई महानगर क्षेत्रातील विविध शहरांना अन्नधान्य आणि भाजीपाला, फळे पुरविणारे नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट आशियातील सर्वात मोठी कृषि उत्पन्न बाजारपेठ असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मार्केट परिसराची एपीएमसी अधिकाऱ्यांसमवेत संयुक्त पाहणी करुन अंतर्गत सफाई अधिक काटेकोरपणे करण्याचे निर्देश दिले.

याप्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, परिमंडळ-१ उपायुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त डॉ. अजय गडदे, उद्यान उपायुक्त स्मिता काळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे आणि इतर अधिकारी तसेच 'एपीएमसी'चे सहसचिव मंदार साळवी, स्वच्छता विभाग उपसचिव दिपक आवटे, फळ मार्केट उपसचिव राजेंद्र कोंडे, कार्यकारी अभियंता मेहबूब व्यापारी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर



एपीएमसी मार्केटमधील कचरा आणि साचणाऱ्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मैदानात उतरुन पाहणी केली. मार्केटमधील कुजलेला भाजीपाला आणि पॅकेजिंग साहित्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी रोखण्यासाठी दररोजच्या कचरा संकलनाचे वेळापत्रक आखण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. विशेष म्हणजे, पश्चिम दरवाजाजवळील पाणी साचण्याच्या समस्येवर तातडीने नाले सुधारणा करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले.

एपीएमसी मार्केटमध्ये येणाऱ्या अवजड वाहनांमुळे स्वच्छतेच्या कामात येणारे अडथळे दूर करण्यासाठी आता गाड्यांचे स्वतंत्र वेळापत्रक तयार केले जाणार आहे. महापालिका आयुक्तांच्या सूचनेनुसार, आठवडाभरात वाहनांच्या येण्या-जाण्याच्या वेळांचा अभ्यास करुन कचरा उचलण्याचे नियोजन केले जाईल. नालेसफाईसाठी महापालिका आपल्या सक्शन पंपांचे सहकार्य देणार असून, आशियातील या मोठ्या बाजारपेठेला चकाचक ठेवण्याचे आव्हान प्रशासनाने स्वीकारले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात फळ मार्केटच्या गेटपाशी साचणाऱ्या पाण्याचे फोटो व्हायरल होतात, याची गंभीर दखल घेत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या भागाची विशेष पाहणी केली. रस्त्याची पातळी मार्केटच्या जमिनीपेक्षा वर असल्याने सदरचा प्रश्न निर्माण होत असल्याचे समोर आले आहे. यावर उपाय म्हणून बंद गटारांची सफाई आणि नाले रुंदीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, जेणेकरुन पावसाळ्यात व्यापाऱ्यांना आणि ग्राहकांना त्रास होणार नाही.

# तालुक्यात मोठ्या प्रमाणात मातीची चोरी

## प्रशासनाचे दुर्लक्ष; शासनाचे करोडोंचे नुकसान

**उरण** : महसूल खात्याचे सर्व अधिकारी गाढ झोपेत असतानाच उरण तालुक्यातील चाणजे, चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, पिरकोण, सारडे, वशेणी, पुनाडे परिसरातून केवळ दिवसाच नव्हे तर रात्रीच्या वेळी देखील माती उत्खनन करण्याच्या प्रकारांचे पेव फुटले आहे. येथील अनेक ठिकाणी डोंगरांना या कंत्राटदाररुपी घुशी लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे ज्या तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या नाका खाली सदर भूमाफिया माती उत्खनन करीत आहेत, याची सुतराम माहिती देखली या अधिकाऱ्यांना नसल्याने शासनाचे करोडोहुन अधिक रुपयांचे नुकसान होत आहे.

जेएनपीए बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण तालुक्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे २०२१ पासून विकासकांनी, भांडवलदारांनी उरण तालुक्यात विशेष लक्ष केंद्रित केले आहे. उरण तालुक्यात अनेक ठिकाणी सरकारी वन विभाग, गुरचरण, खासगी अशा जमिनीतून माती माफिया, गाव पुढारी बिंधासपणे माती चोरुन विकासकाला विकत आहेत. सदर माती माफिया एखाद्या खासगी जागेवर माती काढणीची परवानगी मिळवून हळूहळू बाजुच्या वन जमिनी, सरकारी जमिनी आणि गुरचरणाच्या जमिनीवरही ताव मारुन माती काढून नेत असतात. त्यामुळे जंगली प्राण्यांची आश्रयस्थाने नष्ट होण्याचा धोका निर्माण होऊन डोंगर बोरके होत आहेत.

एकीकडे माती उत्खननाला बंदी असताना दुसरीकडे मात्र दिवस-रात्र जेसीबी, पोकलेन मशिन चालवला जात आहे. राजरोसपणे डंपरच्या माध्यमातून या मातीची वाहतूक देखील सुरु आहे. मात्र, संबंधित गांव सरपंच आणि ग्रामसेवक, तलाठी, मंडल



अधिकारी आणि तहसीलदार यांना याकडे लक्ष देण्यास वेळ नाही. उरण तालुक्यातील चाणजे, चिर्ले, वेश्वी, दिघोडे , विंधने, चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, पिरकोण, सारडे, वशेणी, पुनाडे, आदि भागामध्ये मोठ्या प्रमाणात माती उत्खनन सुरु असल्याने शासनाची अंदाजे ३०० कोटी रुपयांहुन जास्त नुकसान झाल्याचा आरोप शेतकरी, आदिवासी नागरिक व्यक्त करीत आहेत. मात्र, तहसीलदारांना या घटनेची माहिती नाही.

त्यामुळे उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी घटनास्थळावर पाहणी करत उत्खनन झालेल्या डोंगर भागाचे मोजमाप मोजणी कार्यालयातर्फे केल्यानंतर नेमकी किती माती चोरी झाली? शासनाचे किती नुकसान झाले? ते समजू शकेल. मात्र, उरण तालुक्यात कुंपणाने शेत खाण्याचा प्रकार होत असल्याने न्यायाची अपेक्षा करणार तरी काय? असा सवाल सध्या शेतकरी, आदिवासी नागरिक व्यक्त करीत आहेत.

# १८ मे पासून बेलापूरमध्ये ग्लोबल बिझनेस समिट



**सीबीडी** : आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने नवी मुंबईत प्रथमच 'ग्लोबल बिझनेस समिट-२०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. 'यू बिझनेस मिट'च्या वतीने आयोजित सदर समिट १८ मे रोजी बेलापूर येथील 'द पार्क' या तारांकित हॉटेलमध्ये पार पडणार असून या 'समिट'ला थायलंडमधील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर समिट भारत आणि थायलंड यांच्यातील व्यापार वृध्दीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आखाती देशांतील व्यापारावर परिणाम होत असून होर्मुज समुद्र्धुनीवरील तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर विपरीत परिणाम दिसून येत आहेत. अमेरिकेतील युध्दजन्य परिस्थिती, चीन सोबत विश्वासार्हतेच्या प्रश्नांमुळे भारतीय गुंतवणुकदार पर्यायी आणि सुरक्षित व्यवसाय संधींच्या शोधात आहेत. अशा परिस्थितीत थायलंड व्यवसायस्नेही देश भारतीय उद्योजकांसाठी नवीन दालन उघडू शकतो, असा विश्वास आयोजकांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

दोन्ही देशांतील उद्योजक, गुंतवणूकदार आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद निर्माण करुन द्विदेशीय व्यापार वृध्दीस चालना देण्यासाठी सदर 'समिट'चे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध व्यावसायिक क्षेत्रांशी संबंधित स्टॉल्स उभारण्यात येणार असून उद्योग, गुंतवणूक आणि व्यापार विस्तारासाठी प्रत्यक्ष संवादाची संधी उपलब्ध होणार आहे. रिअल इस्टेट, इम्पोर्ट-एक्सपोर्ट, बँकिंग, एज्युकेशन, टेक्नॉलॉजी, मेडिकल टुरिझम, लाईफस्टाईल अँड हेल्थकेअर, स्पेशल आणि स्पिरिच्युअल टुरिझम तसेच ग्लोबल मीडिया अँड एंटरटेनमेंट या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे.

'यू बिझनेस मिट'चे फाऊंडर वैभव सोनटक्के, को-फाऊंडर रवींद्र गुप्ता, को-फाऊंडर तथा सिटीबेल समूह संपादक मंदार दोंदे, विवेक पाटील आणि को-फाऊंडर समृध्दी वाणी यांनी पत्रकार परिषदेत या उपक्रमाची माहिती दिली. या 'समिट'मध्ये सहभागी होण्यासाठी सशुल्क नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून 'बुक माय शो'च्या माध्यमातूनही नोंदणी करता येणार आहे.

# उद्या करिअर मार्गदर्शन

**मुंबई** : विद्यार्थ्यांना मूलभूत विज्ञानातील उच्चशिक्षणाच्या संधींविषयी माहिती मिळावी, या उद्देशाने मराठी विज्ञान परिषदेने १० मे रोजी 'मूलभूत विज्ञानातील उच्च शिक्षणाच्या संधी' (करिअर्स इन बेसिक सायन्सेस) कार्यक्रम आयोजित केला आहे. ८वी ते १२वीचे विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी विनामूल्य (नाव नोंदणी आवश्यक) असलेला हा कार्यक्रम सकाळी १०.३० ते ४.३० पार पडणार आहे.

या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात डॉ. प्रशांत रत्नपारखी (जैवविज्ञान), प्रा. अनुश्री तांबे (गणित), डॉ. अनंत कापडी (रसायनशास्त्र) डॉ. श्रीगणेश प्रभू (भौतिकशास्त्र) हे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. प्रत्येक सत्रानंतर विद्यार्थी आणि पालकांच्या शंकांचे निरसनही असेल. स्थळ : मराठी विज्ञान परिषद, वि.ना.पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई ४०००२२. अधिक माहितीसाठी संपर्क ९९६९१००९६१

## कराटे प्रशिक्षक जेरबंद... (पान १ वरून)

मुलीच्या कुटुंबियांनी तात्काळ पोलिसांकडे तक्रार दाखल केली. माहिती मिळताच, महात्मा फुले पोलिसांनी कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आणि त्याच्यावर पॉक्सो कायद्यासह संबंधित कलमाखाली गुन्हा दाखल केला. पोलीस आरोपीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचीही चौकशी करीत आहेत. या घटनेची बातमी पसरताच परिसरात संतापाची लाट पसरली आहे. आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत मोठ्या संख्येने लोक पोलीस ठाण्याबाहेर जमले. दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कार्यकर्तेही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिले. 'उबाठा'च्या नेत्यांनी या प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात व्हावी आणि आरोपीला कठोरतम शिक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

## जीव धोक्यात... (पान १ वरुन)

परिसरातील, शुभम अपार्टमेंट, जिजामाता कॉलनी आदि परिसरातील रस्त्यालगतचे चेंबर साफ करणाऱ्या कामगारांकडे बघून आला.

या गंभीर बाबीकडे घनकचरा व्यवस्थापन विभागातील वरिष्ठ अधिकारी, आरोग्य निरक्षक यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. संभाव्य बंदिस्त गटारातील चेंबर साफ करताना संभाव्य गटारातील गॅसमुळे मोठी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे. यासंदर्भात कार्यकारी अभियंता प्रसाद सखदेव यांच्याशी संपर्क साधला असता प्रभागनिहाय १० प्रभागातील छोट्या-मध्यम स्वरुपाच्या गटारे-नालेसफाई कामासाठी प्रभागनिहाय १० लक्ष रुपये कामाच्या प्रत्येक प्रभागनुसार एकंदरीत १ कोटी रुपये खर्चाच्या निविदा प्रक्रिया काढण्यात आल्या होत्या. परंतु १० पैकी ५ निविदा प्रक्रियेला ठेकेदाराकडून प्रतिसाद न लाभल्यामुळे फेर निविदा काढण्यात आल्या आहेत. येत्या आठवड्यात निविदा प्रक्रिया पार पडेल. तसेच तोपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून उपायुक्त घनकचरा यांच्या मार्गदर्शनाखाली छोट्या मध्यम स्वरुपाच्या गटारे, नालेसफाईची कामे महापालिका सफाई कर्मचाऱ्यांमार्फत सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

मोठ्या नालेसफाई कामापैकी काही कामे निर्धारित रक्कमेपेक्षा २० टक्के पेक्षा जास्त कमी दरात असून प्रत्यक्ष कामे देखील सुरु झाली आहेत. या मोठ्या नालेसफाई कामांचा महापौर आणि आयुक्त पाहणीदौरे देखील सुरु केले आहेत. पण, छोट्या आणि मध्यम स्वरुपाच्या गटारे नालेसफाई कामांना मुहूर्त कधी मिळणार? यामध्ये काही गौडबंगाल आहे का? अशा चर्चा यानिमित्ताने रंगल्या आहेत.

## नवी मुंबईचा निकाल... (पान १ वरून)

१४,६९३ (९६.२७ टक्के) विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी ४६११ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य (७५ टक्के पेक्षा जास्त), ५०९५ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी (फर्स्ट क्लास), ३५९१ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी (सेकंड क्लास) आणि १४०१ विद्यार्थ्यांना उत्तीर्ण श्रेणी (पास क्लास) मिळाली आहे.

## अभिराम राऊत सर्वप्रथम... (पान १ वरून)

दहावीच्या शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, सभापती स्थायी समिती अशोक पाटील, सभागृह नेते सागर नाईक, विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी अभिनंदन केले आहे. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. नमुंमपा शिक्षण विभागामार्फत सर्व महापालिका शाळेला २१ मार्गदर्शक अपेक्षित संच पुरविण्यात आले होते. दिवाळीच्या सुट्टीत तसेच शाळा सुटल्यानंतर दररोज १ तास विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व शाळांना सराव प्रश्नसंच उपलब्ध करुन देण्यात आले होते. या प्रश्नसंचाचा उपयोग करुन शालेय स्तरावर नियमितपणे सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले. शाळा स्तरावर मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी घेतलेल्या मेहनतीमुळे सदर यश प्राप्त झाले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली, शिक्षणाधिकारी अशोक कडुस, सर्व केंद्र समन्वयक यांनी सातत्यपूर्ण आढावा घेत महापालिकेचे शिक्षण व्हिजन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. त्याचे फलित म्हणजे महापालिका शाळांचा उत्तम निकाल लागला आहे.

## राज्याचा टक्का ९२.०९... (पान १ वरून)

(९७.६२ टक्के) लागला आहे. पुणे, मुंबईसह अनेक विभागांचा निकाल समाधानकारक लागला आहे.

दहावी परीक्षेला राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधील २३,६८३ शाळांमधून एकूण १५,५५,०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४२,४७२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून १४,२०,४८६ विद्यार्थी (९२.०९ टक्के) उत्तीर्ण झाले आहेत. तसेच खाजगी विद्यार्थ्यांची एकूण नोंदणी २९,५०६ इतकी होती, यापैकी २२,००३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. खाजगी विद्यार्थ्यांचा निकाल ७६.३३ टक्के लागला आहे. एकूण १४,५२,१४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण २७.४१ टक्के, प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण ३१.२६ टक्के, द्वितीय श्रेणीमध्ये २४.६६ टक्के तर उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ८.७५ टक्के इतके आहे.

यंदा १०,०३१ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी ९,०४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दुसरीकडे दहावीच्या परीक्षेत एकूण ४०२ कॉपी प्रकरणे आढळली असून सर्वाधिक ८२ कॉपीची प्रकरणे नाशिक विभागात आढळली आहेत.

दहावी निकालाची माहिती राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंग आणि 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक-उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ'चे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदमध्ये दिली.

दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांना गुणांची पडताळणी किंवा उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत हवी आहे, ते ९ मे २०२६ पासून ऑनलाईन अर्ज करु शकतात. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षा जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित केली जाईल. याचे वेळापत्रक लवकरच वेबसाईटवर उपलब्ध होईल. महत्वाचे म्हणजे यावर्षी बोर्डाने एक महत्त्वाचा बदल केला आहे. त्यानुसार आता विद्यार्थ्यांना गुणपत्रिका (मार्कलिस्ट) आणि प्रमाणपत्र (पासिंग सर्टिफिकेट) असे दोन्ही एकाच दस्तऐवजाच्या स्वरुपात मिळणार आहेत.

SOCIAL MEDIA MARKETING PACK
SOCIAL MEDIA MARKETING
Tel.: 2781 5380 / 99675 20006
E-mail: contact@naveshahar.com
NaveShahar
Nave Shahar
Nave Shahar
aaplenaveshahar

### PUBLIC NOTICE

I, Shruti Singh, residing at Goodwill Arcade, Room No.101, Plot No.5, Sector-10, Nerul, Navi Mumbai-400706, hereby declare that my Original SSC Marksheet and Passing Certificate bearing No.1211697/176 (056759) and Year 2021 issued by Council for the Indian School Certificate Examinations, New Delhi, HSC Passing Certificate and Marksheet bearing No. 23/ESS03/015648 and Year 2023 issued by Board of Open Schooling and Skill Education and my School Leaving Certificate issued by Ryan International School, Nerul, Navi Mumbai have been lost/misplaced on or about 24/04/2026 at Trombay Terminus, Sion Trombay Road, Mumbai-400088. If found, please return to the above address. I have filed a Missing Complaint bearing no.59728-2026 on 03/05/2026 at Trombay Police Station.
Whoever finds these documents will have no right, title, or claim over them. I have applied for duplicate copies of the same. Any person having objection to issuance of duplicate certificates may contact me or the issuing authority within 15 days from the date of publication of this notice.

Sd/-
**Shruti Singh**
(M)-9833812233
Place: Navi Mumbai
Date: 09/05/2026

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that Mr. Faisal Shakoor Khan And Mr. Fajaj Shakoor Khan, have agreed to sell Following Plot to My client M/s Advance Group, M/s LPK Infracon LLP and Mr. Faisal Shakoor Khan by executing Tripartite Agreement. The Description of Plot is given in Schedule herein under and the said Plot is allotted by CIDCO Ltd.:-

| NODE | TALUKA | PLOT NO. | SECTOR NO. | Area in Sq. Meter |
|---|---|---|---|---|
| ULWE | PANVEL | 1 K / 1 | 8 C | 199.73 |

All persons having and or claiming any right, title interest, claim or demand by way of sale, mortgage, lease, gift, exchange, inheritance, device trust, partition, charge, lien, possession or otherwise howsoever and whatsoever into upon or in respect of the said above mentioned property or plot should make the same known in writing to the undersigned Advocate at his office on following address :- A-235, First Floor, Vashi Plaza, Sector-17, Plot No.80-81, Vashi, Navi Mumbai-400703, within 15 days from the date of publication of this notice otherwise the said right, titles, interest claim or demand if any will be considered or deemed to have been waived, released abandoned and give up which may please note.

Sd/-
**Adv. Dhiraj. D. Surana**
Office No. A-235, Vashi Plaza,
Sector-17, Plot No.80/81,
Vashi, Navi Mumbai-400703
Place: Navi Mumbai
Date: 09-05-2026

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that Mr. Janardhan Vithal Patil, have agreed to Sell following Plot to My client M/s Advance Group, M/s LPK Infracon LLP and Mr. Faisal Shakoor Khan. The Description of Plot is given in Schedule herein under and the said Plot is allotted by CIDCO Ltd:-

| NODE | TALUKA | PLOT NO. | SECTOR NO. | Area in Sq. Meter |
|---|---|---|---|---|
| ULWE | PANVEL | 1 K | 8 C | 200 |

All persons having and or claiming any right, title interest, claim or demand by way of sale, mortgage, lease, gift, exchange, inheritance, device trust, partition, charge, lien, possession or otherwise howsoever and whatsoever into upon or in respect of the said above mentioned property or plot should make the same known in writing to the undersigned Advocate at his office on following address :- A-235, First Floor, Vashi Plaza, Sector-17, Plot No.80-81, Vashi, Navi Mumbai-400703, within 15 days from the date of publication of this notice otherwise the said right, titles, interest claim or demand if any will be considered or deemed to have been waived, released abandoned and give up which may please note.

Sd/-
**Adv. Dhiraj. D. Surana**
Office No. A-235, Vashi Plaza,
Sector-17, Plot No.80/81,
Vashi, Navi Mumbai-400703
Place: Navi Mumbai
Date: 09-05-2026

### जाहिर नोटिस

या नोटीशीद्वारे सर्व साधारण जनतेला सुचित करण्यात येत आहे की, माझे अशिल **सौ.पल्लवी पुंडलिक देवरे** हे सदनिका क्र. ३०२, ३ रा मजला, बिल्डींग नं. २६, फाम को. ऑप. हौ. सो. लि., प्लॉट नं. १९ व १९ए, सेक्टर-११, कोपरखैरणे, नवी मुंबई, तालुका व जिल्हा ठाणे. (यापुढे यांस सदर मिळकत म्हणुन संबोधले जाईल) या मिळकतीचे मालक आहेत, तरी सदर मिळकतीबाबत, फाम को. ऑप. हौ. सो. लि., ने सौ.पल्लवी पुंडलिक देवरे यांच्या नावे जाहीर केलेले मुळ वाटपपत्र संदर्भ क्र. FAM/ALT/11/02/1006, दिनांक - १५.११.२००२ आणि इतर संबंधीत दस्तऐवज, पावत्या व कागदपत्रे गहाळ झालेले असुन, त्या संदर्भाची नोंद दिनांक ०८.०५.२०२६ रोजी कोपरखैरणे पोलीस ठाणे, कोपरखैरणे, नवी मुंबई, येथे लॉस्ट रीपोर्ट रजी. आय डी. नं. pn9nmQOEAk अन्वये करण्यात आली आहे.

तरी सदर मिळकतीची गहाळ झालेली कागदपत्रे कोणाही व्यक्तीस सापडली असल्यास त्या व्यक्तीने खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर सदर कागदपत्रे हस्तांतरीत करण्यात यावी आणि/अथवा सदर मिळकती बाबत कोणाही व्यक्तीचे, संस्थेचे, बँकेचे/वित्तीय संस्थेचे, कंपनीचे अथवा कोणाचेही दान, गहाण, तारण, लिन, लिज, चार्ज अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत फाम को-ऑप. हौ. सो. ली. च्या कार्यालयात अथवा खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासहीत आणि पुराव्या सहीत लेखी तक्रार नोंदवावी मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिलां व्यतीरीक्त सदर मिळकतीमध्ये कोणतेही हक्क नाहीत व सदरची मिळकत/मालमत्ता पुर्णपणे निर्वेध आहे, असे ग्राह्य धरुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपुर्वेक सोडुन दिलेले आहेत असे समजण्यात येईल व फाम को-ऑप. हौ. सो. ली. सदर मिळकतीचे दुय्यम वाटपपत्र (अलोटमेंट लेटर) जाहीर करतील व आमचे अशिलां त्यानंतर आलेल्या हरकती त्यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत व कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**सदनिका क्र. ३०२, कारपेट क्षेत्र ४०५.०० चौ. फु. इक्वीवेलेंट टु बिल्टअप क्षेत्र ५२८.०० चौ. फु., ३ रा मजला, बिल्डींग नं. २६, फाम को. ऑप. हौ. सो. लि., प्लॉट नं. १९ व १९ए, सेक्टर-११, कोपरखैरणे, नवी मुंबई, तालुका व जिल्हा ठाणे.**

**दिनांक : ०९/०५/२०२६**
**स्थळ : वाशी, नवी मुंबई.**

**सही/-**
**श्री. एस. व्ही. दळवी, ॲडव्होकेट**
ऑफीस नं. १६३, १ला मजला, सेंट्रल फॅसीलीटी बिल्डींग नं. २, पंजाब बँकेच्या वरती, जलाराम मार्केटच्या समोर, सेक्टर-१९, एपीएमसी मार्केट-२, वाशी, नवी मुंबई.
मो. नं. ९८३३८११८५५

### जाहिर नोटिस

या नोटीशीद्वारे सर्व साधारण जनतेला सुचित करण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. सतिश व्ही. आहुजा** आणि **सौ. सोनाली सतिश आहुजा** हे युनिट नं. ४५, तळ मजला, मर्चटस् सेंटर, प्लॉट नं. १४, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई, (यापुढे यांस सदर मिळकत म्हणुन संबोधले जाईल) या मिळकतीचे मालक असुन, तरी सदर मिळकतीचे मे. श्री बालाजी एन्टरप्रायझेस, डेव्हलपर्स आणि नवी मुंबई मर्चटस् चेंबर, मान्यता देणार आणि श्री. सतिश व्ही. आहुजा आणि सौ. सोनाली सतिश आहुजा यांच्यात दिनांक - ०८.१०.२००८ रोजी ॲग्रीमेंट निष्पादीत झाले असुन त्याची नोंदणी सह दुय्यम निबंधक ठाणे - ३, यांच्या कार्यालयात दिनांक - १०.१०.२००८, रोजी दस्तऐवज नोंदणी क्र. ५९८५/२००८, अन्वये झालेल्या ॲग्रीमेंटचा मुळ दस्त, मुळ नोंदणी पावती व इंडेक्स २ आणि इतर संबंधीत दस्तऐवज/कागदपत्रे व रीसीप्टस् गहाळ झाले असुन त्या संदर्भाची नोंद/तक्रार दिनांक ०८.०५.२०२६ रोजी एपीएमसी पोलीस ठाणे, एपीएमसी, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई, येथे लॉस्ट रीपोर्ट रजी. आय डी. नं. fvBUOOa6od, अन्वये करण्यात आली आहे.

तरी सदर मिळकतीची गहाळ झालेली कागदपत्रे कोणाही व्यक्तीस सापडली असल्यास त्या व्यक्तीने खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर सदर कागदपत्रे हस्तांतरीत करण्यात यावी आणि/अथवा सदर मिळकती बाबत कोणाही व्यक्तीचे, संस्थेचे, बँकेचे,/वित्तीय संस्थेचे, कंपनीचे अथवा कोणाचेही दान, गहाण, तारण, लिन, लिज, चार्ज अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासहीत आणि पुराव्या सहीत लेखी तक्रार नोंदवावी मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिलां व्यतीरीक्त सदर मिळकतीमध्ये कोणतेही हक्क नाहीत व सदरची मिळकत/मालमत्ता पुर्णपणे निर्वेध आहे, असे ग्राह्य धरुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपुर्वेक सोडुन दिलेले आहेत असे समजण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकती त्यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत व कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**युनिट नं. ४५, कारपेट क्षेत्रफळ २३.३३३ चौ.मी. (बिल्ट अप क्षेत्रफळ २८.०० चौ.मी.), तळ मजला, मर्चटस् सेंटर, प्लॉट नं. १४, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई, तालुका व जिल्हा ठाणे.**

**दिनांक : ०९/०५/२०२६**
**स्थळ : वाशी, नवी मुंबई.**

**सही/-**
**श्री. एस. व्ही. दळवी, ॲडव्होकेट**
ऑफीस नं. १६३, १ला मजला, सेंट्रल फॅसीलीटी बिल्डींग नं. २, पंजाब बँकेच्या वरती, जलाराम मार्केटच्या समोर, सेक्टर-१९, एपीएमसी मार्केट-२, वाशी, नवी मुंबई.
मो. नं. ९८३३८११८५५

### जाहिर नोटिस

या नोटीशीद्वारे सर्व साधारण जनतेला सुचित करण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. पोन्नाथपुर नारायण मूर्ती** आणि **सौ. पुष्पा मुर्ती** हे फ्लॅट क्र. १०२, १ ला मजला, प्रोग्रेसिव्ह सॉलीटेअर को. ऑप. हौ. सो. ली. प्लॉट नं. १५/३, सेक्टर-११, कोपरखैरणे, नवी मुंबई, तालुका व जिल्हा ठाणे (यापुढे यांस सदर मिळकत म्हणुन संबोधले जाईल) या मिळकतीचे मालक असुन, तरी सदर मिळकतीचे मेसर्स. प्रोग्रेसीव्ह सिव्हील इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि श्री. पोन्नाथपुर नारायण मूर्ती आणि श्रीमती पुष्पा मुर्ती यांच्यात दिनांक ११.०२.२००५ रोजी करारनामा निष्पादित झाला असुन, त्याची नोंदणी दिनांक ११.०२.२००५ रोजी सह जिल्हा निबंधक ठाणे - ३ यांच्या कार्यालयात दस्तऐवज नोंदणी क्र. ११६०/२००५ अन्वये झालेली असुन, त्या सदर दस्ताची मुळ सुची क्र. २ (Index-II) आणि इतर संबंधीत दस्तऐवज/कागदपत्रे व रीसीप्टस् गहाळ झाले असुन त्या संदर्भाची नोंद/तक्रार दिनांक ०८.०५.२०२६ रोजी कोपरखैरणे पोलीस ठाणे, कोपरखैरणे, नवी मुंबई, येथे लॉस्ट रीपोर्ट रजी. आय डी. नं. 91cIKDITI5, अन्वये करण्यात आली आहे.

तरी सदर मिळकतीची गहाळ झालेली कागदपत्रे कोणाही व्यक्तीस सापडली असल्यास त्या व्यक्तीने खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर सदर कागदपत्रे हस्तांतरीत करण्यात यावी आणि/अथवा सदर मिळकती बाबत कोणाही व्यक्तीचे, संस्थेचे, बँकेचे/वित्तीय संस्थेचे, कंपनीचे अथवा कोणाचेही दान, गहाण, तारण, लिन, लिज, चार्ज अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासहीत आणि पुराव्या सहीत लेखी तक्रार नोंदवावी मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिलां व्यतीरीक्त सदर मिळकतीमध्ये कोणतेही हक्क नाहीत व सदरची मिळकत/मालमत्ता पुर्णपणे निर्वेध आहे, असे ग्राह्य धरुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपुर्वेक सोडुन दिलेले आहेत असे समजण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकती त्यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत व कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही ह्यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**फ्लॅट क्र. १०२, क्षेत्रफळ १०३८.०० चौ. फुट, कारपेट (१२४६.०० चौ. फुट, बिल्टअप एरीया), १ ला मजला, प्रोग्रेसिव्ह सॉलीटेअर को. ऑप. हौ. सो. ली. प्लॉट नं. १५/३, सेक्टर-११, कोपरखैरणे, नवी मुंबई, तालुका व जिल्हा ठाणे.**

**दिनांक : ०९/०५/२०२६**
**स्थळ : वाशी, नवी मुंबई.**

**सही/-**
**श्री. एस. व्ही. दळवी, ॲडव्होकेट**
ऑफीस नं. १६३, १ला मजला, सेंट्रल फॅसीलीटी बिल्डींग नं. २, पंजाब बँकेच्या वरती, जलाराम मार्केटच्या समोर, सेक्टर-१९, एपीएमसी मार्केट-२, वाशी, नवी मुंबई.
मो. नं. ९८३३८११८५५



# पारसिक हिलवरील भूखंड बिल्डरच्या घशात; पर्यावरणप्रेमी संतप्त

**नवी मुंबई** : नवी मुंबईतील फुफ्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारसिक हिल परिसरातील शेकडो झाडांनी व्यापलेला मौल्यवान भूखंड 'सिडको'ने बिल्डरच्या घशात घातल्याचा गंभीर आरोप पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून केला जात आहे.

बेलापूर, सेक्टर-२३ मधील प्लॉट क्रमांक-९ येथील तब्बल ८५४२ चौरस मीटरचा भूखंड 'सिडको'ने निवासी वापरासाठी मेसर्स लेवा पटेल इन्फ्रा यांना लीजवर वितरीत (अलॉट) केल्यानंतर या परिसरात संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे, या भूखंडावर शेकडो मोठी झाडे अस्तित्वात असतानाही बिल्डरकडून जागेला पत्र्याचे कुंपण घालून झाडे तोडण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

काही ठिकाणी प्राथमिक स्वरुपातील साफसफाई आणि झाडांच्या फांद्या छाटण्याचे कामही सुरु झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पारसिक हिलच्या पर्यावरणीय अस्तित्वावरच घाला घातला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. नागरिकांच्या तक्रारीनंतर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असून संबंधित प्रकरणात पुढील कारवाईची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, एवढा गंभीर प्रकार सुरु असताना नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विरोधी विभागाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई न केल्याने महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

झाडांची कत्तल सुरू असताना महापालिकेचा अतिक्रमण विरोधी विभाग नेमके काय करत आहे? असा संतप्त सवाल पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे. पारसिक हिल परिसर जैवविविधता, नैसर्गिक हरित पट्टा आणि स्वच्छ वातावरणासाठी ओळखला जातो. मात्र, 'सिडको'च्या सदर निर्णयामुळे हिरवाई नष्ट करुन कॉँक्रीटचे जंगल उभारण्याचा मार्ग मोकळा करण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे सदरचे अलॉटमेंट तात्काळ रद्द करुन संपूर्ण परिसर संरक्षित घोषित करावा, अशी मागणी आता जोर धरु लागली आहे.

# अतिक्रमणधारकाने काढली 'एमआयडीसी' कारभाराची लक्तरे!

## मुरबाडमधील प्रकार, अधिकारी हतबल, ग्रामस्थांचे उपोषण




**ठाणे** : 'चोर तो चोर, वर शिरजोर' या म्हणीचा प्रत्यय मुरबाड तालुक्यातील मोहघरमधील ग्रामस्थांना येत आहे. बारवी प्रकल्पग्रस्तांच्या वसाहतीतील राखीव जागेवर बांधकाम करणाऱ्या एका अतिक्रमणधारकाने कायदा व सुव्यवस्थेचे नाव देऊन 'एमआयडीसी'कडून होणारी जमिनीची मोजणी थांबवली असल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. गावातील अंतर्गत भूखंडाऐवजी काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाठबळामुळे रस्त्यालगतच्या राखीव जागेवर बिनधास्तपणे बांधकाम करणाऱ्या अतिक्रमणधारकावर कारवाई करण्यासाठी 'एमआयडीसी'चे अधिकारी हतबल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर संतप्त मोहघर ग्रामस्थांनी ठाण्यात ७ मे रोजी उपोषण करून प्रशासनावर कारवाईची आग्रही मागणी केली. या प्रकारामुळे मुरबाड तालुक्यातील 'एमआयडीसी'च्या बेजबाबदार कारभारावर प्रकाश पडला आहे.

बारवी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केलेल्या मोहघर गावातील मार्केटसाठी राखीव जागेचा ताबा 'एमआयडीसी'तील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर संगनताने एका ग्रामस्थाला दिला असल्याच्या निषेधार्थ वागळे इस्टेट येथील 'एमआयडीसी' कार्यालयाबाहेर ग्रामस्थांनी उपोषण केले. तसेच राखीव जागेवरील बांधकामाला स्थगिती देण्याची मागणी केली.

बारवी धरणाची उंची वाढविल्यानंतर विस्थापित झालेल्या मोहघर येथील कुटुंबांचे मुरबाड-कर्जत रस्त्यावरील म्हसा गावानजीकच्या ७५ भूखंडावर पुनर्वसन करण्यात आले. पुनर्वसन आराखड्यानुसार मोहघर येथील राखीव जागेवर मार्केट उभारण्याचे नियोजन होते. एका प्रकल्पग्रस्ताला भूखंड क्र. ४७ ब प्रदान केल्याचे दाखविण्यात आले. परंतु, त्याने 'एमआयडीसी' कार्यालयातील तीन अधिकारी व कर्मचाऱ्यांबरोबर संगनमताने परस्पर रस्त्यालगतच्या राखीव जागेवर बांधकाम सुरू केले आहे, असा आरोप सरपंच सीमा भोईर, बारवी प्रकल्पपिडीत संघटनेचे अध्यक्ष कमलाकर भोईर आणि पोलीस पाटील रामचंद्र भोईर यांनी केला. त्याविरोधात ग्रामस्थांनी 'एमआयडीसी' कार्यालयाबाहेर उपोषण केले. तसेच राखीव जागेवरील बांधकाम हटविण्याच्या मागणीचे निवेदन प्रादेशिक अधिकारी नितीन चव्हाण यांना दिले. त्यानंतर प्रशासनाने लेखी उत्तर पाठविले. 'एमआयडीसी' प्रशासनाने भूखंड क्र. ४७ ब चा ताबा दिला असल्याचे पत्रात स्पष्ट केल्यानंतरही कारवाईसाठी टाळाटाळ केली जात आहे. यापूर्वी ग्रामस्थांनी 'एमआयडीसी'कडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र, त्याची दखल घेण्यात आली नव्हती. त्यानंतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्यानंतर ग्रामपंचायतीने 'एमआयडीसी'कडे दाद मागितली आहे.

मोहघरच्या सरपंचांना पाठविलेल्या पत्रात, पुनर्वसित गावठाणामधील सर्व भूखंडाची संयुक्त पाहणी करण्यासाठी ५ मे रोजी 'एमआयडीसी' च्या ठाणे प्रादेशिक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी जागेवर गेले होते. त्यावेळी भूखंड क्र. ४७ ब च्या भूखंडधारकाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगून मोजणीसाठी मज्जाव केला. त्यामुळे आगामी काळात वरिष्ठ कार्यालयाकडून मंजुरी घेऊन लवकरात लवकर मोजणी व राखीव भूखंडावरील अतिक्रमण झाले असल्यास कारवाईचे आश्वासन प्रादेशिक अधिकारी नितीन चव्हाण यांनी दिले आहे. या पत्राबद्दल सरपंच सीमा भोईर यांनी आश्चर्य व्यक्त केले. केवळ एका अतिक्रमणधारकाच्या आक्षेपानंतर अधिकाऱ्यांनी माघार का घेतली. जादा पोलिस बंदोबस्त का घेण्यात आला नाही, असा सवाल सरपंच सीमा भोईर यांनी केला.

# घणसोली सेंट्रल पार्क जलतरण तलावातील कर्मचाऱ्यांचा अचानक संप

## क्रीडा उपयुक्तांच्या मध्यस्थीनंतर संप मागे



**वाशी** : नवी मुंबई महापालिकेच्या घणसोली सेंट्रल पार्क मधील कर्मचाऱ्यांचे पगार थकल्याने कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले होते. मात्र, महापालिका क्रीडा विभागाच्या उपायुक्तांच्या मध्यस्थीनंतर थकीत वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर अखेर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला असून जलतरण तलाव पुन्हा सुरु झाले.

कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मागील अनेक महिन्यांपासून वेतन थकले होते. वारंवार पाठपुरावा करुनही प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत होती. परिणामी, आर्थिक अडचणीत सापडलेल्या कर्मचाऱ्यांनी अखेर ५ मे रोजी संपाचा मार्ग स्वीकारला. या आंदोलनामुळे महानगरपालिकेच्या कारभारातील ढिसाळपणा पुन्हा एकदा समोर आला.संपाचा सर्वाधिक फटका नागरिकांना बसला. विशेषत: पोहण्यासाठी येणारे विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक तसेच फिटनेससाठी नियमित पोहणारे नागरिक यांचे नियोजन विस्कळीत झाले. काही ठिकाणी जलतरण तलाव पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते.

दरम्यान, प्रशासनाच्या कामकाजावर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. एकीकडे अधिकाऱ्यांचे वेतन नियमित होत असताना कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ पगार न मिळणे गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त झाले. तसेच जलतरण तलावाच्या प्रवेश प्रक्रियेतून जमा होणाऱ्या निधीच्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर उपायुक्तांनी हस्तक्षेप करत संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेतली. त्यानंतर थकीत पगार देण्याचा निर्णय घेण्यात आला. वेतन मिळाल्यानंतर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला असून परिस्थिती पूर्ववत करण्याचे काम सुरु झाले आहे.

तथापि, या घटनेमुळे महापालिकेच्या आर्थिक नियोजन आणि प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भविष्यात अशी वेळ पुन्हा येऊ नये, यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अभिजित पाटील यांच्या कडून केली जात आहे.

# कॅशिअर निघाला चोर; बँकेतील १५.४९ लाख रुपयांवर डल्ला

**पनवेल** : पनवेलमधील जी.एस.महानगर को-ऑपरेटिव्ह बँकेत कामाला असलेल्या कॅशिअरनेच ग्राहकांनी बँकेत विश्वासाने ठेवलेल्या तब्बल १५ लाख ४९ हजार ५०० रुपयांचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे या कॅशिअरने सदरची रक्कम शेअर मार्केटमध्ये लावल्याचे कबूल केले आहे. बँकेने दिलेल्या तक्रारीनुसार पनवेल शहर पोलिसांनी कॅशिअर विरोधात अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याच्यावर पुढील कारवाई सुरु केली आहे.

बँकेतील रक्कमेचा अपहार करणाऱ्या कॅशिअरचे नाव विकास किसन कदम असे असून तो पनवेल येथील टपाल नाका, मिरची गल्ली भागात असलेल्या जी.एस. महानगर को-ऑपरेटिव्ह बँकेत कॅशिअर म्हणून काम करत होता. मार्च महिन्यामध्ये त्याची या शाखेत बदली झाली होती. त्यानंतर आरोपी विकास कदम याने २८ एप्रिल ते २ मे २०२६ या कालावधीत लोकांनी विश्वासाने बँकेकडे सोपवलेली तब्बल १५,४९,५०० रुपयांची रोकड लंपास केली.

गत आठवड्यात मुख्य कार्यालयातील अधिकारी पनवेल शाखेत जमा असलेली रोख रक्कम घेऊन जाण्यासाठी कॅश व्हॅन घेऊन आले होते. यावेळी बँकेत जमा असलेल्या रक्कमेत पैसे कमी असल्याचे आढळून आले. त्यानंतर बँकेच्या व्यवस्थापकांनी याबाबत कॅशिअरकडे चौकशी केली असता, त्याने सुरुवातीला उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर बँकेतील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विकास कदम याला विश्वासात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता, त्याने बँकेतील रक्कमेचा अपहार केल्याचे तसेच सदरची रक्कम त्याने शेअर मार्केटमध्ये लावल्याचे कबूल केले.

त्यानंतर बँकेचे व्यवस्थापक भाऊसाहेब म्हस्के यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी विकास कदम याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. बँकेतीलच जबाबदार कर्मचाऱ्याने अशा प्रकारे मोठा आर्थिक अपहार केल्याने बँकिंग क्षेत्रात आणि ग्राहकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस आता या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करीत असून, अपहार केलेली रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत.

# लॉजवर छापा; ४ महिलांची सुटका, ३ आरोपी जेरबंद

**नेरुळ** : नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने नेरुळ येथील लॉजवर छापा टाकून त्याठिकाणी वेश्याव्यवसासाठी आणल्या गेलेल्या ४ महिलांची सुटका केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ आरोपींना अटक केली आहे.



अन्वर शेख नावाचा व्यक्ती ग्राहकांना वेश्यागमनासाठी महिलांची व्यवस्था करुन देत असून एका महिलेसाठी तब्बल २० हजार रुपये आकारले जात असल्याचे तसेच वेश्याव्यवसासाठी नेरुळ परिसरातील लॉजचा वापर केला जात असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे आणि त्यांच्या पथकाने बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. त्यानंतर नेरुळ, सेक्टर-१४ येथील द ब्लेस हॉट स्टे लॉजिंग अँड बोर्डिंगवर ६ मे रोजी रात्री ११ च्या सुमारास छापा टाकला. त्यानंतर पोलिसांनी सदर लॉजमध्ये वेश्याव्यवसायाठी आणण्यात आलेल्या ४ पीडित महिलांची सुटका केली.

पोलिसांनी या प्रकरणात सहभागी असलेल्या मोहम्मद हानिफ रजफ ब्यारी, अन्वर आलम इसाक शेख आणि लॉज व्यवस्थापक राजेश सदानंद ढवले या तिघांना अटक केली आहे. या आरोपींविरोधात नेरुळ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपींना पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास नेरुळ पोलीस करीत आहेत. सदर कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## राजकीय लढाईत...

(पान १ वरुन)

'शिवसेना महाविकास आघाडी'चा गट अधिकृत असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल दिला. या निर्णयामुळे अंबरनाथच्या राजकारणात शिवसेनेची रणनीती यशस्वी ठरली असून भाजपच्या राजकीय गणितांना खीळ बसली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सदर प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रलंबित होते. मात्र, अखेर सदर निर्णय 'अंबरनाथ नगरपरिषद'च्या बाजुने लागला आहे. तो एका अर्थाने जनतेचा विजय आहे, अशी प्रतिक्रिया शिवसेना ज्यष्ठ नगरसेवक राजेंद्र वाळेकर यांनी दिली.


## नवी मुंबई महानगरपालिका

निवडणूक तात्काल

जा.क्र.नमुंमपा/पथविक्रेता/निवडणूक/15/2026
दिनांक- 08/05/2026

### मतदान केंद्रे (Polling Booths) शुध्दीपत्रक

महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम 2016६ अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बायोमॅट्रिक सर्वेक्षण झालेल्या पथविक्रेत्यामधुन एकुण 08 सदस्यांची शहर पथविक्रेता समितीवर निवड करण्यासाठी, निवडणूक कार्यक्रम-२०२६ जाहीर करण्यात आलेला असुन दिनांक 29/05/2026 रोजी सकाळी 07:30 ते सायंकाळी 05:00 या वेळेत मतदान होणार आहे.

त्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जा.क्र.नमुमपा/पथविक्रेतानिवडणूक/01/2026, दिनांक 29/04/2026 रोजीच्या जाहीर प्रकटनाद्वारे मतदान संबंधित विभाग कार्यालयाच्या ठिकाणी असे नमुद करण्यात आले होते. सदर मतदान केंद्रांच्या ठिकाणामध्ये बदल करण्यात आलेला असुन मतदान केंद्र खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत. कृपया बदलाची नोंद घ्यावी.

| अ.क्र | विभाग | मतदान केंद्राचा पत्ता |
|---|---|---|
| 1 | बेलापूर | पहिला मजला, वारकरी भवन, सेक्टर-3 सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ |
| 2 | नेरुळ | कै. मारुती बाळू भगत नमुंमपा शाळा क्र. १० सेक्टर- २० खोली क्र.१ तळ मजला, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६ |
| 3 | वाशी | तळमजला, नागरी सुविधा केंद्रा शेजारील खोली, वाशी विभाग कार्यालय, सेक्टर-१६, वाशी, नवी मुंबई-४००/७०३, |
| 4 | तुर्भे | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मृती भवन, तळ मजला, भूखंड, १८७, सेक्टर -१० सानपाडा, नवी मुंबई-४००७०५, |
| 5 | कोपरखैरणे-1 | पहिला मजला, अण्णासाहेब पाटील सभागृह, सेक्टर-६, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ |
| 6 | कोपरखैरणे-2 | पहिला मजला, अण्णासाहेब पाटील सभागृह, सेक्टर-६. कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ |
| 7 | घणसोली | पहिला मजला, नमुंमपा समाज मंदिर, सेक्टर-७ घणसोली, नवी मुंबई ४००७०१. |
| 8 | ऐरोली | पहिला मजला, बहुउद्देशीय इमारत, सेक्टर-३. विभाग कार्यालय शेजारी, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८ |
| 9 | दिघा | खोली क्र. २८, नर्मुमपा शाळा क्र. १०८, दिघा विभाग कार्यालयशेजारी, दिघा, नवी मुंबई-४००७०८ |

सही /-
(अजय साबळे)
निवडणुक निर्णय अधिकारी
नवी मुंबई शहर पथविक्रेता समिती
पथविक्रेता सदस्य निवडणूक-2026

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/364/2026


## मुली बेपत्ता...

(पान १ वरुन)

शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तर अशाच प्रकारे दुसऱ्या घटनेत कोनगांव पोलीस ठाणे हद्दीतील रांजनोली हद्दीतील १५ वर्षीय मुलगी राहत्या घरातून ५ मे रोजी सकाळी ८ वाजता निघून गेली असता रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने याप्रकरणी कुटुंबियांच्या तक्रारीवरुन कोनगाव पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महापालिकेत नोकरी...

(पान १ वरुन)

घेऊन आवश्यक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत नियुक्ती प्रक्रिया पूर्ण केली. ८ मे रोजी प्रातिनिधीक स्वरुपात १० जणांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली असून उर्वरित जणांना प्रशासनामार्फत नियुक्तीपत्राचे वाटप करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांमध्ये तसेच त्यांच्या वारसांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, शिवसेना गटनेते पवन कदम, महापालिका आयुक्त सौरभ राव तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

## यशाची परंपरा कायम...

(पान १ वरून)

निकाल ९४.८७ टक्के लागला असून, येथे वरद संतोष चव्हाण याने ९७.८० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. आदित्य अभय खोंड याने ९५.४० टक्के गुणांसह द्वितीय आणि दिक्षा प्रवीण धेंडे हिने ९१.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. या शाळेतील एकूण ७७ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.

भगिनी मंडळ संचलित श्रीमती सुहासिनी प्रभाकर अधिकारी माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९१.९१ टक्के लागला आहे. या विद्यालयात वरद विष्णू प्रसाद घोसाळकर ९४.८० टक्के गुणांसह प्रथम आला असून, समीक्षा विद्याधर खेडेकर ९३.८० टक्के गुणांसह द्वितीय आणि समृध्दी शरद गिरी ९२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.

दि एज्युकेशन सोसायटीच्याच महात्मा गांधी विद्यालयाचा निकाल ८८.४१ टक्के लागला असून, यात सानिया गणेश गाडगे हिने ९२ टक्के मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तेजस्विनी नाना पांढरे ९०.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर अनुष्का दुर्योधन वीर ९०.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## निर्घृण हत्याकांडाचा निकाल...

(पान १ वरून)

रुपयांची रोकड घेऊन पलायन केले होते.

या घटनेत गंभीर जखमी झालेल्या लक्ष्मीदेवी यांनी मोठ्या धैर्याने इमारतीखाली येऊन एका साक्षीदारासमोर इंग्रजी पेपरवर 'सतीश के साले ने मेरे पती को मारा' असे लिहून आरोपीची ओळख पटवून दिली होती. सतर्क नागरिकामुळे त्यांना वेळेवर उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले. त्यानंतर एनआरआय पोलिसांनी आरोपी संदीप गुप्ता याच्यावर हत्येसह विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती.

या गुन्ह्याचा तपास एनआरआय पोलीस ठाण्याच्या तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांनी केला होता. तसेच पनवेल न्यायालयात आरोपी विरोधात दोषारोपपत्र दाखल केले होते. पनवेल सत्र न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरु होती, २ वर्ष चाललेल्या या सुनावणीत एकूण १६ साक्षीदार तपासण्यात आले. या खटल्याच्या सुनावणीत सरकारी वकील वाय. एस. भोपी यांनी केलेला प्रभावी युक्तीवाद आणि लक्ष्मीदेवी यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली.

पनवेल जिल्हा-सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. आर. उगले यांनी आरोपी संदीप गुप्ता याला दोषी ठरवून कलम ३०२ (खून), ३०७ (जीवे मारण्याचा प्रयत्न), ३९४ आणि ३९७ (चोरी, जखम करणे) अन्वये जन्मठेपेची शिक्षा आणि ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच दोन वेळा ७-७ वर्षांचा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच जप्त केलेले दागिने, ८० हजार रुपये आणि दंडाची रक्कम फिर्यादी लक्ष्मीदेवी यांना देण्याचे आदेश देखील न्यायालयाने दिले आहेत.

# निवृत्त नौदल अधिकाऱ्याची ४२ लाखांची फसवणूक

**कोपरखैरणे** : गुगल मॅप्सवर हॉटेलना रेटींग देऊन घरबसल्या मोठी कमाई करण्याचे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी निवृत्त भारतीय नौदल अधिकाऱ्याकडून तब्बल ४२ लाख ५१ हजार रुपये उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. कोपरखैरणे पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले ६० वर्षीय भारतीय नौसेनेतील निवृत्त अधिकारी कोपरखैरणे, सेक्टर-७ मध्ये राहण्यास आहेत. सायबर गुन्हेगारांच्या टोळीने मे २०२५ मध्ये या निवृत्त अधिकाऱ्याला टेलिग्राम आयडीवरुन संपर्क साधला होता. त्यानंतर समोरच्या व्यक्तीने त्यांना विविध हॉटेल्सना गुगल मॅपवर रेटींग देण्याचे सोपे काम दिले आणि त्या बदल्यात चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवले. सुरुवातीला विश्वास संपादन केल्यानंतर, तक्रारदाराला वेगवेगळ्या बँक खात्यात पैसे गुंतवण्यास भाग पाडले.

त्यानुसार निवृत्त नौसेना अधिकाऱ्याने ३ ते २४ मे २०२५ या कालावधीत एकूण ४२ लाख ५१ हजार रुपये सायबर भामट्यांनी सांगितलेल्या विविध बँक खात्यांवर ऑनलाईन पाठवले. मात्र, मोठ्या प्रमाणावर रक्कम गुंतवूनही त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही. तसेच मुद्दल रक्कमही परत मिळाली नाही. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरुन पोलिसांनी या प्रकरणातील सायबर गुन्हेगारांविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम नुसार गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, कोणतेही कष्टाशिवाय घरबसल्या पैसे कमविण्याचे आमिष दाखवणारे मेसेज किंवा टास्क फ्रॉडपासून सावध रहा. अनोळखी व्यक्तीने सांगितलेल्या खात्यात पैसे ट्रान्सफर करु नका. फसवणूक झाल्यास त्वरित १९३०या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबई पोलिसांनी केले आहे.

## रुग्णालयात तोडफोड अन्...

(पान १ वरून)

केली, ज्यामध्ये अंदाजे १ लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच त्यांनी ड्युटीवर असलेल्या डॉ. पाण्डेय आणि इतर कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिली. रुग्णालयाची शांतता भंग करुन डॉक्टरांच्या शासकीय कामात अडथळा आणला आणि कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. डॉ. पाण्डेय यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मध्यवर्ती पोलिसांनी महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये, मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजिंक्य धोंडे करीत आहेत.

# संपादकीय

वर्ष - ३३ अंक-७

## गोरगरिबांना दिलासा

ठाणे जिल्ह्यातील शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य शासन तर्फे घेण्यात आल्याने ठाणे जिल्ह्यातील लाखो गोरगरिबांच्या घरांना हक्काची जमीन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय गोरगरिबांना न्याय देणारा ऐतिहासिक क्रांतिकारी बदल ठरणारा असला तरी, या प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने युध्दपातळीवर काम करण्याची गरज आहे, याचा विसर पडून चालणार नाही. अतिक्रमण नियमितीकरण योजनेचा लाभ शेवटच्या पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने एकत्र काम करण्याची देखील आवश्यकता आहे.महाराष्ट्र शासनाने २५ मार्च २०२६ रोजी घेतलेला शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाकांक्षी असून, सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयामुळे आणि तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असलेला घरांचा प्रश्न आता कायमस्वरुपी सुटण्याच्या दिशेने पडलेले महत्वपूर्ण पाऊल आहे.शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या शासन निर्णयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे केवळ घरच नव्हे, तर अतिक्रमण करुन घर बांधलेले जमीन देखील आता संबंधित नागरिकाच्या नावावर होणार आहे. शासकीय निर्णयानुसार शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी घरे पती आणि पत्नीच्या संयुक्त नावावर नियमित केली जाणार असून, यामुळे महिलांनाही घराचा मालकी हक्क मिळणार आहे. ठाणे जिल्हा या निर्णयाचा राज्यातील सर्वात मोठा लाभार्थी ठरणार असून, ग्रामीण भागासह महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रातील लाखो लोकांना या निर्णयामुळे हक्काचे छत मिळणार आहे. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी शासनाने पुराव्यांची प्रक्रिया अत्यंत सोपी केली असून, रहिवास पुरावा, वीज बिल, ८-अ उतारा किंवा यापूर्वी प्रशासनाकडून मिळालेल्या नोटिसा आधारभूत मानल्या जाणार आहेत. किमान ५०० ते कमाल १५०० चौरस फुटांपर्यंतची अतिक्रमणे या नियमावलीनुसार नियमित केली जाणार असून, या निर्णयामध्ये ५०० फुटांपर्यंतच्या घरांसाठी विशेष सवलत देण्यात आली आहे. अर्थात, शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा शासन निर्णय केवळ 'निवासी' प्रयोजनासाठी असलेल्या अतिक्रमणांसाठीच लागू आहे. शासकीय किंवा गायरान जमिनींवर वेअरहाऊस, गोदामे किंवा व्यावसायिक बांधकाम करुन अतिक्रमणे केली असलेल्या नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना केवळ गरजू आणि गोरगरीब व्यक्तींच्या राहत्या घरासाठी असून, जमिनीचा गैरवापर टाळण्यासाठी या जमिनी पुढील पाच वर्षे हस्तांतरित करता येणार नाहीत आणि त्या 'वर्ग २' या स्वरुपात राहणार आहेत. ज्या कुटुंबातील एका व्यक्तीने लाभ घेतला आहे, त्या कुटुंबातील दुसऱ्या सदस्याला या योजनेचा फायदा घेता येणार नाही. या योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत असून, अर्ज प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत त्यावर निर्णय घेण्याचे बंधन प्रशासनावर घालण्यात आले आहे. एकूणच, शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय नगरविकास, ग्रामविकास आणि महसूल या तिन्ही विभागांच्या संयुक्त समन्वयाने राज्य शासनातर्फे घेण्यात आला असला तरी या निर्णयाची अंमलबजावणी करताना प्रशासकीय स्तरावर कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात आली नाही तर शासकीय आणि गायरान जमिनींवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे अतिक्रमण नियमितीकरणाच्या कामाला वेग येणार नाही, इतके लक्षात ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे.

# वाचकांचे मनोगत

### आत्महत्या हे संकटाचे उत्तर असुच शकत नाही

वाढत असलेले ताणतणाव, उंची जीवनशैली, समाजात न मिसळणे, मनातील राग, भिती कुणाला सांगता न येणे यामुळे नैराश्य वाढीस लागते. निकाल मनासारखा न लागणे, कर्ज फेडु न शकणे, आई-बाबा रागवणे, भ्रमणध्वनी न मिळणे, आजार असणे अशी क्षुल्लक आणि गंभीर अनेक कारणे आहेत. नैराश्य नेमक्या कोणत्या गोष्टीमुळे आले आहे हे समजून घेतले पाहिजे. आत्महत्येचा तो विचार, तो क्षण टाळण्यासाठी समुपदेशन, वैद्यकीय मदत, संवाद साधणे या गोष्टी केल्या पाहिजे किंवा घडवुन आणल्या पाहिजेत. वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर त्या व्यक्तीला योग्यवेळी मदत मिळाली तर ती व्यक्ती आत्महत्या करणार नाही. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होणे व करणे धोकादायक आहे. शालेय विद्यार्थी, युवा पिढी, महिला, पुरष, शेतकरी, वृध्द सर्व वयोगटात मानसिक समस्या आढळतात. आत्महत्या हे संकटाचे उत्तर असुच शकत नाही. आलेल्या संकटाला तोंड देणे महत्वाचे. एकत्र कुटुंब पध्दतीचा अस्त हेच याचे मुळ कारण असावे कारण धीर द्यायला, समस्यांवर विचार करुन उत्तर शोधायला आपली वडिलधारी आणि समवयस्क माणस जवळ नसतात. ही एक मानसिक स्थिती आहे, जिथे माणूस आशा गमावतो आणि स्वत:वरचा विश्वासही. २०२२ मध्ये भारतात १,७१,०० लोकांनी आत्महत्या केल्या. तर जगात हीच संख्या ७,४०,००० च्या जवळपास आहे. भारतातच नव्हे, तर जगभरात आत्महत्यांचे प्रमाण वाढते आहे. आरोग्य विभाग, काही संस्था यांनी २४ तास हेल्पलाइन, चॅटबॉट सुरु केले आहे त्याचा उपयोग होतो; पण जवळची माणसांनी मानसिक आजार पटकन ओळखुन नकळत इलाज केल्यास आत्महत्येच्या दिशेने जाणारे पाऊल रोखता येते. दरवर्षी १० सप्टेंबरला जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्ताने आत्महत्या न करणं या विषयी जागृती केली जाते. शाळा, महाविद्यालय, चित्रपट सुरु होण्याआधी, आकाशवाणी, दुरदर्शन, लिखित माध्यम येथे जाणीव जागृती करावी व आत्महत्या करण्यास प्रतिबंध करावा. नागरिकांनी आपल्या आजुबाजुस असे घडु नये याकरीता सदैव जागृत असावे म्हणजे आत्महत्यांना आळा बसेल.

**- लीना वालावलकर, कांदिवली**

### परीक्षा कायमची रद्द करा

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी हिंदी भाषा परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेत असल्याची माहिती मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली. केवळ परीक्षेला स्थगिती नको तर ही परीक्षा कायमची रद्द करावी. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी तत्कालीन मुंबई सरकारने शासकीय पत्र व्यवहार व माहितीची देवाणघेवाण सुलभ होण्यासाठी कर्मचाऱ्यांना हिंदी भाषा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले होते. पण महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाला आहे. १ मे १९६६ पासून सर्वच शासकीय कामकाज मराठीत करण्यात येत आहे. म्हणून मराठी भाषिक राज्यात हिंदीची परीक्षा सेवाशर्तींचा भाग म्हणून घेण्याची गरज नाही. बिगर हिंदी राज्यात अशी हिंदीची परीक्षा घेतली जात नाही. म्हणून ही परीक्षा कायमची रद्द करावी.

**-बकुल बोरकर, विले पार्ले**

# नेत्यांची खाज आणि कांद्याचे राज, ओळखण्याची काळाची गरज



चार राज्ये एक केंद्र शासित राज्याच्या विधानसभा निवडणूकी जाहिर होताच सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी प्रचाराचा पारा वाढविला. राजकीय गर्मी वाढवली, टिव्ही चॅनेलवाल्यांनी आपापल्या चॅनेलवर चर्चेचे गुऱ्हाळ चालवून त्यात भर घातली. हा निवडणूकीचा पारा तर उतरला, कारण सर्व विधानसभेच्या निवडणूकीचे निकाल लागले.

निवडणूकीची गर्मी ओसरली असे वाटत असतांनाच उन्हाळ्याच्या गर्मीने आपला असर दाखवायला सुरुवात केली आहे. देशासह बहुतेक सर्वच राज्यात उष्णतेने कहर माजवला आहे. उत्तर भारतात त्याचा असर जास्त जाणवतो. तरीही दरवर्षाच्या मानाने या वर्षीची उष्णता अधिक दाहक वाटू लागली आहे. हवामान खाते व केंद्र तसेच राज्य सरकारेही लोकांना दक्षतेच्या सुचना देत आहेत. या सुचना पाळणारे पाळतात, कारण त्यांचे काम एका छताखाली, पंख्याखाली वा 'एसी रुम' मध्ये असते. ते काम करण्यासाठी जे जातात ते एक तर आपापल्या चार चाकी 'एसी'च्या गाड्यातून जातात, पण रिक्षा आणि दुचाकी वाहनातून प्रवास करणाऱ्यांना उन्हाचा त्रास सहन करावाच लागतो. अशात पंचाईत होते ती उन्हातान्हात मोकळ्या मैदानात किंवा निळ्या आकाशाखाली काम करणाऱ्यांची. कारण त्यांचे पोटच रोजच्या कामाच्या रोजंदारीवर चालते. अशी मंडळी सरकारच्या सुचनांचे पालन कसे करणार? अशा मजूरांना सुचना दिल्या जातात. जास्त वेळ खासकरुन दुपारच्या उन्हात राहू नका. जर ते उन्हात राहणार नाही तर काम कसे पूरे करणार?

रब्बीची पिके काढून झाल्याने आता शेतकऱ्यांना आपल्या सर्वच जमिनीची नांगरट करणे अत्यावश्यक आहे. पुढील पेरणीसाठी जमीनीची मशागत आवश्यक आहे आणि हे काम उन्हा-तान्हातच करावे लागते. शहरापेक्षा खेडेगावात खासकरुन कोरड्या प्रदेशात उन्हाच्या झळा वाहताना दिसतात. बिचाऱ्या हरणांना तर त्या झळा पाण्याच्या प्रवाहासारख्या वाटतात व हरणांचे कळप त्या दिशेने पळू लागतात. त्यांना पाणी तर मिळत नाही, पण, एखादा शिकारी त्यांची शिकार मात्र करु शकतो.सरकारने वन्य प्राण्याच्या शिकारीवर बंदी घातली आहे. पण चोरुन लपून छपून शिकार करणारे आजही समाजात आहेत.

अशा उन्हातान्हात कामे करणाऱ्यांच्या संख्येचा अंदाज घेण्याचे एका संस्थेने ठरवून त्यांचा सर्वे केला असता असे आढळून आले की, देशाच्या लोकसंख्येचा ३/४ भाग म्हणजे जवळ जवळ ३८ कोटी मजूर असे काम करतात. ज्यांना ऊन आणि गर्मीचा सामना करावा लागतो. जसे की, शेतीकाम, इमारती बांधकाम व अन्य असंघटीत क्षेत्रे. ज्यावर अर्धी अधिक अर्थव्यवस्था अवलंबून आहे.

गेल्या अनेक वर्षापासून पर्यावरणवादी लोक टाहो फोडून सांगत आहेत की, 'झाडे लावा, झाडे जगवा' पर्यावरणाचा ऱ्हास टाळा, वृक्ष तोड थांबवा. वृक्ष तोडीवर आळा घालण्यासाठी सरकारने 'वन रक्षक' विभाग तयार केला आहे. हजारो कर्मचारी त्यात काम करतात, त्यांना सरकारकडून पगार व भत्ते मिळतात; पण ते किती प्रमाणात वनाचे रक्षण करतात हा संशोधनाचा विषय आहे. त्यांच्याच सहकार्यातून जंगल माफिया वृक्ष तोड करुन अब्जावधीची कमाई करुन मोकळे झाले आहेत. त्यांना सरकारकडूनही काही प्रमाणात संरक्षण मिळते असे बोलले जाते, त्यात सत्यही असावे अशी स्थिती आहे.

आत्ताच अशी स्थिती आहे तर पुढे काय होणार? सर्वेच्या रिपोर्टप्रमाणे येत्या काही काळात म्हणजेच २०३० पर्यंत २० करोड लोकांना गर्मीचा सामना करावा लागेल. वाढत्या गर्मीचा दुसरा तोटा म्हणजे दुनियाभरात लाखो रोजगार संपण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारतातील गर्मी (लू) फक्त मौसमी राहिलेली नाही तर ती आर्थिक आणि सामाजिक

**शेतकऱ्यांना दिलासा देणारे पीक म्हणजे कांदा, बटाटा, लसूण, ऊस. पण कांदा हे असे पीक आहे की जे जास्त काळ टिकत नाही. त्यामुळे त्याची विक्री वेळीच होणे गरजेचे असते. पण या पिकाचे महत्त्वही तितकेच आहे. कांद्याचे राज समजून घेणे गरजेचे आहे. कांदा कापतांना कापणाऱ्याच्या डोळ्यातून पाणी येते. त्याचे हे राज आजवर कोणालाही कळले नाही, आपल्यात एक व्यक्ती आहे त्याला त्याचे हे राज समजले आहे. त्या व्यक्तिचे नाव आहे 'सिंधिया'. ते म्हणतात 'कांदा खा आणि गर्मी घालवा'.**

संकट बनत चालली आहे. जागतिक स्तरावर तापमान वाढत चालल्याने नैसर्गिक परिवर्तन ही होत आहे. मागील चाळीस वर्षापासून 'लू' वाल्या दिवसातही वाढ होत आहे. त्याचा फटका अन्नधान्य उत्पादनाला बसला आहे.

**पंचनामा**
**भिमराव गांधले**

जगात भारत हा एकमेव देश आहे. जिथे तीन ऋतूचा आशिर्वाद होता. पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा. त्यानुसारच भारतीय शेती केली जात असे. पण, जागतिक तापमानात फरक झाल्याने आपल्याकडील ऋतूमानही बदलले, पावसाळ्यातील खरीपाच्या पिकावर, अर्थात पेरणीपासून काढणीच्या वेळा कमी जास्त झाल्या आणि त्यातच पावसाच्या कमी जास्तीमुळे पिकांच्या उत्पादनात चढ उतार व मध्येच पडणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडून काढले.

एकीकड या आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देण्याचे नाटक होत आहे; त्याचवेळी वृक्षतोडीचे प्रमाणही वाढत चालले आहे. त्यासाठी शहरांचा विकासाच्या, शहरा-शहरांना जोडणाऱ्या रस्त्याच्या विकासाच्या नावाखाली वृक्षतोड होत आहे. वृक्षवाढीस अनेक वर्षाचा कालावधी जातो. तेही त्याच्या देखभालीवर अवलंबून असते.

सरकारे आपल्या चेल्या चपाट्यांसह धनिक व्यवसायीकांच्या फायद्यासाठी सफाईदारपणे खोटे बोलून लोकांच्या डोळ्यात धूळफेक करत असतात. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे नाशिक शहरात होऊ घातलेला 'कुंभमेळा' यासाठी तपोवनातील हजारो जुनी व मोठी झाडे कापली गेली. आंदोलकांवर वेगवेगळे आरोप करुन त्यांचा आवाज दाबला जात आहे. नेत्यांना कुंभमेळ्याची खाज सुटली आहे. या मेळाव्याच्या सुविधेसाठी २५००० कोटी रुपयांचा निधी देऊ केला आहे. पण, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी सरकारकडे पैसा नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत त्याचे सरकारला सोयर-सुतक नाही.

शेतकऱ्यांना दिलासा देणारे पीक म्हणजे कांदा, बटाटा, लसूण, ऊस. पण कांदा हे असे पीक आहे की जे जास्त काळ टिकत नाही. त्यामुळे त्याची विक्री वेळीच होणे गरजेचे असते. पण या पिकाचे महत्त्वही तितकेच आहे. कांद्याचे राज समजून घेणे गरजेचे आहे. कांदा कापतांना कापणाऱ्याच्या डोळ्यातून पाणी येते. त्याचे हे राज आजवर कोणालाही कळले नाही, आपल्यात एक व्यक्ती आहे त्याला त्याचे हे राज समजले आहे. त्या व्यक्तिचे नाव आहे 'सिंधिया'. ते म्हणतात 'कांदा खा आणि गर्मी घालवा' मागे एकदा आपल्या अर्थमंत्री म्हणाल्या होत्या की 'मी कांदा लसूण खात नाही. त्यामुळे त्याचे मला देणे घेणे नाही. उलट पंतप्रधान म्हणतात मी कांदा लसूण खातो; कारण कांदा लसूण हे जेवणातील महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्याशिवाय जेवण अधूरेच!

पूर्वीचे लोकही म्हणायचे डोक्यावर कांदा ठेवला तर उन्हाळी लागत नाही. कांदा हा उन्हाला मारक आहे, तर जैनधर्मिय मुनी म्हणतात कांदा, लसूण हा तामसी आहे. खरे काय, खोटे काय, पण एक गोष्ट खरी की, कांद्याशिवाय कोणतीही भाजी अधूरीच. म्हणूनच जगात कोठेही जा तिथे कांदा-लसणाला अधिक मागणी आहेच. त्याचे उत्पादनही मोठे आहे आणि त्याचा खपही मोठा आहे. मात्र त्याचे एक वैशिष्ट्य आहे का तो केव्हा कुणाच्या डोळ्यातून पाणी काढेल याचा नेम नाही.

सिंधियाजीच्या नवीन शोधाने कांद्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. काहींना वाटत आहे. कांद्याला इतरांची नजर लागते की काय, कारण त्यांनी कांद्याला खाण्याची शिफारसच केली नाही तर त्यांच्या आकलनानुसार कांद्याला खिशात ठेवले तरी गर्मी (लू) तुमचे काहीही वाकडे करु शकत नाही. आपण अल-नीनोला सुध्दा घाबरवू शकतो.

आता आपण जलवायू परिवर्तनालाही ठेंगा दाखवू शकतो. ग्लोबल वार्मिंग आमचे काय वाईट करणार? अरे आमच्या जवळ कांदा आहे. ग्लोबल वार्मिंगने हिम नग (ग्लेशियर) वितळले तर वितळले त्यामुळे आमचे काही बिघडणार नाही. कारण आमच्या जवळ कांदा आहे. एवढ्यावरच सिंधिया थांबले नाहीत तर त्यांनी कांदा हा डोके व अक्कलेची गर्मी करु शकतो. अगर कांद्याने पार्किंगसाठी होणारे विवाद, शेजाऱ्यांची भांडणे, किंवा लाचखोरी मिटवता आली असती तर किती बरे झाले असते. त्याचबरोबर नेत्यांना निवडून आणण्यासाठीही कांद्याचा वापर झाला असता तर किती चांगले झाले असते.

कांद्याचे आणखी एक महत्त्व समोर आणले आहे की, १०० जोडे खाऊन कांदा खाण्याचा मोका कोणाला मिळाला त्याने तो सोडू नये. भीती याची वाटते की, अशाने 'एसी' कुलर, पंखे यांचा धंदा चौपट होऊ नये. अरे आमच्याकडे कांदे आहेत ना! गर्मी घालवण्यासाठी आमच्याकडे कांदे आहेत ना! गर्मी घालवण्याचा रामबाण इलाज.

अगर कोणाला गर्मीचा 'लू' चा त्रास झाला तर, त्याने आपल्या जवळ कांदा ठेवला का नाही याची चौकशी करुन, त्याच्याजवळ कांदा नसेल त्यालाच दोषी मानले पाहिजे व त्याला शिक्षाही झालीच पाहिजे. उष्णतेने एखादा मेला असला तरी त्यीच मरणोपरांतही त्याच्यावर मुकादमा झाला पाहिजे व त्याच्या घरच्या माणसावरही तो झाला पाहिजे.

जसे की, दवाखान्यात उपचारादरम्यान एखादा रोगी दगावला तर डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी होते, तशीच मागणी घरच्या सदस्यांबाबत झाली पाहिजे.

आपल्याकडे अती गर्मीने आणि अति थंडीने लोक मरतात, त्याला सरकार नव्हे, तर घरचीच मंडळी जबाबदार धरली पाहिजे. असली डोकेबाज मंडळी आपल्या राजकारणात दिमाखात मिरवतात. अशांना आपण नागरिक सन्मान का देतो हेच समजत नाही.

# संवादातून

## दिशादर्शक आणि मार्मिक व्यक्तिचित्रणे

अनघा प्रकाशन ठाणे यांनी सुप्रसिद्ध जेष्ठ साहित्यिका प्रा. प्रतिभा सराफ यांचे 'संवादातून' हे लक्षणीय पुस्तक प्रकाशित केले आहे. मलपृष्ठावर निळ्या आभाळाखाली दोन उत्तुंग काळेकभिन्न पर्वत, मध्ये अती खोल दरी, पर्वतांच्या दोन टोकावर दोन माणसे बसली आहेत. त्यांच्यामधे दरी असली तरी ते एकमेकाशी संवाद साधत आहेत. हे आत्ताच्या युगाचे अतिशय बोलके मुखपृष्ठ आहे. आज माणसा-माणसात, मित्रामित्रांत, भावा भावात भावनिक दरी आहे. मोबाईलसारखी अत्याधुनिक साधने जवळ असली तरी लोक पूर्वीसारखी एकमेकाशी बोलत नाहीत. ही खोल दरी मानसिक, आर्थिक, जातीयवादी, धर्मवादी, प्रांतवादी असू शकते. अनेक अर्थांचे प्रतिबिंब दरीत जाणवत आहेत. पण पर्वत टोकावरील दोन माणसे संवाद साधताना दिसत आहे. त्यामुळेच दरीच्या तळातून एक हिरवे रोप उगवले आहे. प्रदीप मापसेकर यांचे हे मुखपृष्ठ लक्षवेधी, अर्थबोधी झालेले आहे. मलपृष्ठावर १४ नररत्नांचे फोटो आहेत, ज्यांच्याविषयी प्रा. प्रतिभा सराफ यांनी लिहिले आहे. १५ वा फोटो प्रतिभा सराफांचा आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ देखणे, अर्थवाही आहे. वाचक पाहताच हे पुस्तक हातात घेईल हे निश्चित.

आपल्या मनोगतात प्रा. प्रतिभा सराफ लिहितात- 'आयुष्यात खुप माणसे भेटली; पण प्रत्येकाचे व्यक्तिचित्रण करण्याची संधी साधता आली नाही. आपल्या क्षेत्रातील अभ्यासू वृत्ती, परिश्रम, वेळ, पैसा देण्याची वृत्ती, सर्वस्व देण्याची आकांक्षा अचंबित करणारी आहे. कर्तृत्ववान माणसाचे व्यक्तिचित्रण एका लेखात मावू शकत नाही. त्यांच्या एखाद्या लक्षणीय पैलूचा विचार केलेला आहे.' या पुस्तकातील सर्व व्यक्तिचित्रणांना अंतर्नाद, शब्दवर्दळ, रूची, श्री, अक्षरधन, सर्वोत्तम, लिलाई, शब्दवेल या दिवाळी अंकात पूर्वप्रसिद्धी मिळाली आहे. धेय आणि चिकाटीने यशाची शिखरे गाठणारी हे दिग्गज आहेत. निश्चयाच्या, कर्तृत्वाच्या, आत्मविश्वासाच्या काही पाय-या ते शिकवणार आहेत. कोणताही वाचक मरण्यापूर्वी हजार आयुष्य



जगतो. पण जो माणूस कधीच वाचत नाही तो फक्त एकच आयुष्य जगतो.' या पुस्तकात एकूण १४ व्यक्तिचित्रणे आहेत. म्हणजेच चौदा रत्ने आहेत. त्यांचा रंग, प्रकाश पुस्तकात पडला आहे.

संवादातून व्यक्तीमत्व उलगडत जाणा-या या पुस्तकात पहिले व्यक्तीमत्व आहे. डॉ. आनंदी नाडकर्णी - संवेदनाशील माणसाच्या स्वत:च्या मानसिक आंदोलनातून उद्भवणा-या छोट्याशा कवितेतूनसुध्दा खुप काही शिकता येते. उपासना धर्म कोणताही असला तरी कसोटी काळात त्याची सांगड मानवता धर्माशी घालणे महत्वाचे आहे. कोरोनाच्या लॉकडाऊन काळातील महत्वाचे अनुभव कथन या संवादात आहे. लेखाखाली व्यक्तीचित्रणाच्या व्यक्तीची ठलक वैशिष्ट्ये दिली आहेत. दुसरे आश्चर्यकारक व्यक्तिचित्रण आहे , अभिनेता आमीर खान यांचे. कारण तो हिंदी भाषिक अभिनेता आहे. आमीर खान - माझी आई मला बालपणी सांगायची भाषा शिकणे 'ईम्पॉर्टंट' आहे. पण त्यावेळी मी फक्त खेळत असे, मी

**पुस्तक परिक्षण**

तिचे कधी ऐकलं नाही. भाषा शिकल्यामुळे जगाबरोबर सबंध तयार होतो. त्यामुळे व्यक्तीमत्व संपन्न होते. रामायण/महाभारत वेबसिरीजमध्ये काम करण्यासाठी मला मराठी शिकण्याची गरज निर्माण झाली होती. तेव्हा मला भाषेचे महत्त्व कळले होते. खाली परिचयात त्याचे चित्रपट पुरस्कार, पाणी टंचाई दुर होण्यासाठी स्थापन केलेल्या 'पानी फॉन्डेशनचे' कार्य याची माहिती दिली आहे. तिसरे व्यक्तीमत्व आहे, शब्दप्रभू नाटककार प्रेमानंद गज्वी - ते म्हणतात..मी कोणत्याही कवीला काव्यकार म्हणतो. आम्ही 'बोधी नाट्य परिषद' ही वीस वर्षापूर्वी स्थापन केली होती. बोधी म्हणजे ज्ञान. सर्वसाधारण कथा लिहिताना आपण वर्णन करतो. पण तिच कथा कविता स्वरूपात लिहिली तर कमी शब्दात व्यक्त होते. समाजात असलेली कुरूपता नष्ट करण्याचे काम साहित्यिकाचे आहे. भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही देशाचे शत्रू आहेत. तुम्ही तुमच्या भूमिकेशी लेखक म्हणून प्रामाणिक असले पाहिजे. लेखकाचे आयुष्य लेखक लिहतो, वाचन, मनन, चिंतन करतो. खाली अल्प परिचयात - १५ नाटके, अनेक पुरस्कार, ९९ व्या अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष ( नागपूर) यांची माहिती आहे. चौथे व्यक्तिचित्रण आहे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भौतिक शास्त्रज्ञ डॉ.रोहिणी गोडबोले. ह्या प्रा.प्रतिभा सराफ यांच्या भौतिक शास्त्राच्या शिक्षिका आहेत. त्या 'नॅशनल टॅलेंट सर्च'मुळे संशोधनाकडे वळल्या. त्यांची आई उत्तम कविता लिहायची. "आज माझ्या परीक्षेचे फळ तुझ्या हाती आले, आणि तुझ्या डोळ्यांतून पूर अश्रूंचे लोटले." "नाव लावणारा पुत्र, नाही होणे गं हातात, नाव लावणारी कन्या, आई होईन मी निश्चित." वानगीदाखल दोन कवितांचे तुकडे आशयघनता दर्शवतात. त्या म्हणतात- जीवनात आनंद महत्वाचा आहे. खरं तर हे जग बदलणारे शास्त्रज्ञ असतात. पण ते सहसा कुणाचे आदर्श नसतात. ही खंत त्यांनी व्यक्त केली आहे. लेखाखाली चाळीस वर्षाचे काम, संशोधन, पुरस्कार, आंदोलन यांची माहिती आहे. पाचवे व्यक्तिचित्रण आहे, मानवतावादी विचारांचे डॉ. लक्ष्मीकांत देशमुख. ते म्हणतात- कोणत्याही पुस्तकाने आपली ओळख व्हावी ह्या लेखकासाठी प्रचंड आनंदाचा क्षण असतो. 'इन्किलाब विरूध्द जिहाद' या कादंबरीतून देशमुख यांना आंतरराष्ट्रीय कादंबरीकार म्हणून किर्ती मिळवून दिली. ती कादंबरी ९०० पानी आहे. लेखकास त्याची सर्वच पुस्तके महत्वाची असतात. दुष्काळग्रस्त कथा लिहिल्या, दुष्काळग्रस्तांच्या व्यथा, वेदना लिहिणारा लेखक अशी ओळख झाली. खाली अल्प परिचयात शिक्षण, कारकिर्द, पदे, सन्मान, कामे तसेच १० कादंब-या, १२ कथासंग्रह यांची माहिती आहे. सहावे व्यक्तिचित्रण आहे संपादिका निलिमा कुलकर्णी. त्या सांगतात.. धनंजय आणि चंद्रकांत हे दिवाळी अंक घरात यायचे. दिवाळी अंकांच्यामुळे लेखकां समवेत कौटुंबिक सबंध आले. त्यातून 'राजेंद्र' ही प्रकाशन संस्था सुरू केली. पुस्तके छापली. खाली अल्प परिचयात ३३ वर्षे दिवाळी अंकाचे अनुभव, गच्चीवरील शेतीचे प्रयोग, हस्तकलेची आवड अशी माहिती आहे. सातवे व्यक्तिचित्रण आहे संशोधक आणि समीक्षक डॉ.अनंत देशमुख. ते म्हणतात.. मी पूर्ण वेळ संशोधनात आहे. जगात लेखक अनेक आहेत;

**गज आनन म्हात्रे**

पण समीक्षक कमी आहेत. अध्यापन केले, ४० व्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली. १९७८ पासून समीक्षा लिहिल्या, संशोधनपर पुस्तकांचे लेखन, साहित्यिक कार्यक्रमात उपस्थिती तसेच ते उत्कृष्ट फोटोग्राफर आहेत. माहिती देतात, मार्गदर्शन करतात. त्यांची कविता- "पाणवठ्यावर गायी स्थिर, त्यांचे डोळे डबडबलेले, आणि माझ्या काळजात, तुझे चित्र ओलावलेले." खाली अल्प परिचयात.. प्रकाशित साहित्य, पुरस्कार, संशोधन, समीक्षा,चरित्रकार, पि.एच.डी. मार्गदर्शक अशी माहिती आहे.

या 'संवादातून' पुस्तकात एकूण १४ व्यक्तिचित्रणे आहेत, पैकी ७ व्यक्तिचित्रणांची मी ओळख दिली आहे. बाकी ७ व्यक्तिचित्रणे तुम्ही पुस्तक विकत घेऊन वाचायची आहेत. जेष्ठ साहित्यिका प्रा. प्रतिभा सराफ यांनी विविध दिवाळी अंकासाठी ह्या मुलाखती घेतल्या. यात प्रश्न नेमकेपणाने विचारले गेले आहेत म्हणून उत्तरेही समर्पक आली आहेत. सिध्द/ प्रसिद्ध व्यक्तींची ही व्यक्तिचित्रणे दिशादर्शक आणि मार्मिक अशी उतरली आहेत. आकाशात असंख्य तारे असतात. ते सारे अनेक रंगात/प्रमाणात चमकत असतात. त्यांचे स्थानही वेगवेगळे असते तरी ते सुंदरच दिसतात. निसर्गात अनेक प्रकारची, रंगाची, आकाराची फुलं असतात. ते आपले गुणविशेष बाळगुन असतात. ती रसिकप्रिय असतात. तशी या ' 'संवादातून' पुस्तकात १४ व्यक्तिचित्रणे प्रकाशित झालेली आहेत. बाकी ७ व्यक्तिचित्रणात वाईल्ड लाईफ फोटोग्राफर अभिनेता सुयश टिळक, अष्टपैलू व्यक्तीमत्व शिवाजी गावडे, ईशा टुर्सचे आत्माराम परब, टेरिफिक लेखक सुनील जावळे, स्त्री मुक्ती संघटनेच्या अश्विनी रानडे, विश्वकोश संपादिका विजया वाड माझी गोष्ट असा ऐवज आहे. अनेक दिग्गज या पुस्तकातील अवकाशात आहेत. १७० पानांत हा साहित्याचा खजिना आहे. वाचकांस त्यातून नवतेजाचा दिवा दिसेल; तसेच या पुस्तकाच्या प्रत्येक पानापानांतून दवबिंदूसारखी चमकणारी "प्रतिभा" दिसेल याची मी खात्री देतो.

**संवादातून**
**लेखिका - प्रा.प्रतिभा सराफ**
**प्रकाशक- अनघा प्रकाशन ठाणे**
**पृष्ठे - १७० मूल्य ३००/-रु.**

# एमडी ड्रग्जसह सराईत गुन्हेगाराला बेड्या

## कामोठेत अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

**नवी मुंबई** : नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने कामोठे परिसरात धाड टाकून सराईत गुन्हेगाराला मेफेड्रॉन (एमडी) या अंमली पदार्थासह अटक केली आहे. अब्दुल खालीद अब्दुल रशिद शेख (३४) असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून ३ लाख ६५ हजार रुपये किमतीचे ८ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या आरोपीवर २०१२ मध्ये खुनाचा गुन्हा देखील दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

मानखुर्द परिसरातून एक व्यक्ती एमडी पावडर घेऊन कामोठे परिसरात विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे आणि त्यांच्या पथकाने कामोठे, सेक्टर-३४ मधील मानसरोवर कॉम्प्लेक्स, बिल्डींग क्र.९/ बी येथील रुम क्र.६०२ मध्ये छापा टाकला.



**गोवंडीतील मुख्य पुरवठादार फरार...**
पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत अब्दुल शेख याने सदरचे अंमली पदार्थ गोवंडी येथील आदिल नावाच्या व्यक्तीकडून आणल्याचे कबूल केले आहे. या माहितीवरुन कामोठे पोलिसांनी अब्दुल खालीद शेख आणि पाहिजे असलेला आरोपी आदिल या दोघांविरोधात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

या कारवाईत पोलिसांनी अब्दुल खालीद अब्दुल रशिद शेख याला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून ३,६५,००० रुपये किमतीचे ८ ग्रॅम एमडी आणि ड्रग्ज विक्रीसाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे. अब्दुल खालीद मुळचा चेंबूर येथील रहिवासी असून सध्या कामोठे येथे वास्तव्यास होता. अब्दुल शेख याच्यावर २०१२ मध्ये कळंबोली पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# दहावी परीक्षा मध्ये 'साईनाथ इंग्रजी-हिंदी हायस्कूल'चे उल्लेखनीय यश

**नवी मुंबई** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल ८ मे रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला असून, वाशी मधील साईनाथ एज्युकेशन ट्रस्ट संचालित 'साईनाथ इंग्रजी हायस्कूल'चा दहावी परीक्षाचा निकाल ९९.०९ टक्के आणि 'साईनाथ हिंदी हायस्कूल'चा दहावी परीक्षाचा निकाल ९५.२७ टक्के लागला आहे.

दहावी परीक्षेत 'साईनाथ इंग्रजी हायस्कूल' मध्ये अवनश अनिल पाटील (९२.८० टक्के) याने प्रथम, तमन्ना दिलीप द्विवेदी (९०.४० टक्के) हिने द्वितीय तर कनक राकेश गुप्ता (८९.८० टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. 'साईनाथ इंग्रजी हायस्कूल' मधील दहावी परीक्षा दिलेल्या १११ विद्यार्थ्यांपैकी ११० परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

दहावी परीक्षेत 'साईनाथ हिंदी हायस्कूल' मध्ये प्रेम सुनील ठाकूर (८४.६० टक्के) याने प्रथम, विकास रमेशकुमार पाल (८३.८० टक्के) याने द्वितीय तर शिवम संतोष गोड (८३.८० टक्के) याने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. 'साईनाथ हिंदी हायस्कूल' मधील दहावी परीक्षा दिलेल्या १४८ परीक्षार्थींपैकी १४१ परीक्षार्थींनी यश प्राप्त केले आहे.

दहावी परीक्षा मधील यशाबद्दल 'साईनाथ एज्युकेशन ट्रस्ट'चे अध्यक्ष हरिबंश सिंह, महासचिव इशिका सिंह आणि संचालक टी. पी. सिंह यांनी दोन्ही हायस्कूलच्या प्राचार्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि गुणवंत परीक्षार्थींचे अभिनंदन करुन त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोस्टल रोडमुळे ठाण्याची वाहतूक कोंडी फुटणार

## २८ टक्के काम पूर्ण, दोन वर्षांत सेवेत; आमदार संजय केळकर यांची पाहणी

**ठाणे**: खारीगाव ते गायमुख हा २३ किमी लांबीचा कोस्टल मार्ग हा गेम चेंजर प्रकल्प ठरणार असून डिसेंबर २०२८पर्यंत खुला होणार आहे. या प्रकल्पामुळे घोडबंदर मार्गासह अंतर्गत रस्त्यावरील वाहतुकीवरचा ताण कमी होणार आहे. या प्रकल्पाचे २८ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती देताना आमदार संजय केळकर यांनी कांदळवनातील अडथळे दूर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. आमदार संजय केळकर यांनी ७ मे रोजी एमएमआरडीएचे मुख्य अभियंता आणि कंत्राटदार कंपनीच्या अधिकाऱ्यांसह या प्रकल्पाची बाळकुम येथे पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत माहिती दिली.



सहा महिन्यांपूर्वी या प्रकल्पाचे काम सुरू झाले असून ४० महिन्यांत हे काम पूर्ण होणार आहे. या मार्गातील काही भाग कांदळवनाच्या ठिकाणी एलिव्हेटेड असून २०२८पर्यंत हे काम पूर्ण होणार असल्याचे केळकर यांनी सांगितले. घोडबंदर मार्गावरील अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे ठाणेकरांना कोंडीचा सामना वर्षभर करावा लागतो. या प्रकल्पामुळे या वाहतुकीवरचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार असून कळव्यातून होणाऱ्या वाहतुकीलाही दिलासा मिळणार असल्याची माहिती केळकर यांनी दिली. यावेळी आढावा बैठकीत आमदार संजय केळकर यांच्यासह संजय पाटील, सुरज दळवी, जितेंद्र मढवी व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

### कांदळवनावर अतिक्रमणांचा अडथळा

कोस्टल रोडचा काही भाग एलिव्हेटेड असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे पाहणी दौऱ्यात आढळून आले. काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरू असून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकण्यात आला आहे. ही अतिक्रमणे कोस्टल रोड प्रकल्पाला अडथळा ठरणार असून ती तातडीने दूर करण्यात यावीत, अशा सूचना शआमदार संजय केळकर यांनी कांदळवन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

# नवी मुंबई महानगरपालिका

## अतिक्रमण विभाग

### धोकादायक इमारती विषयी जाहिर आवाहन

उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीच्या अनुषंगाने या नोटीसीव्दारे सोबत जोडलेल्या यादीतील इमारतीमध्ये वास्तव्य करणारे मालक / भोगवटादार किंवा इतर यांना असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि.०५.११.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार, आपण राहत असलेली इमारत निवासी / वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत तसेच या इमारतीमधील निवासी / वाणिज्य वापर तात्काळ थांबवावा व धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत आपणांस लेखी सूचना / नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सी-१ प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जल जोडणी खंडीत करण्यात येईल. तसेच वेळोवेळी वर्तमानपत्राव्दारे जाहिर आवाहन करण्यात आलेले आहे. आपण रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्तहानी होण्याचा संभव आहे. सदर इमारतीचा / बांधकामाचा निवासी / वाणिज्य वापर त्वरीत बंद करून सदरची इमारत / बांधकाम त्वरीत विनाविलंब तोडून टाकावे. अशी कार्यवाही न केल्यास इमारत / बांधकाम कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त आपणच जबाबदार राहाल. महानगरपालिका यास जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**अतिधोकादायक सी - १ इमारती सन २०२६ - २७**

| अ. क्र. | विभाग | वर्ष | अ. क्र. | धोकादायक इमारतींचे नाव | धोकादायक इमारतींची / सोसायटीची संख्या | धोकादायक इमारतींची संख्या | सी-१ अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या | रहिवास वापर सुरु आहे काय? होय/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेलापूर विभाग | २०१८-१९ | १ | निलगिरी कॉ. ऑप, से. २४/२५, इमारत क्र.इ-३ | ३ | १ | सी-१ | नाही |
| २ | | | २ | निलगिरी कॉ. ऑप, बंगला क्र.७, से. २४ | | १ | सी-१ | नाही |
| ३ | | | ३ | निलगिरी कॉ. ऑप, बंगला क्र.८ से. २४ | | १ | सी-१ | नाही |
| ४ | | २०१९-२० | १ | मे. श्री गणेश को. ऑप. हौ.सो.लि., मधील बिल्डींग नं. ए-१ ते ए-४, बी- १ ते बी - ८, सी- १ ते सी-४ व डी-१ ते डी-२, व (Commercial Building नं. 1 व 2 ), भु.क्र. १, सेक्टर-२८, नेरुळ, नवी मुंबई | १ | २० | सी-१ | होय |
| ५ | | २०२५-२६ | १ | नितीन स्मृती, भु. क्र. -बी- १४५, से-२९, अग्रोळी गाव, बेलापुर, नवी मुंबई- ४००६१४. | १ | १ | सी-१ | होय |
| ६ | | २०२६-२७ | १ | व्हाईट हाऊस को-ऑप हौ सोसायटी लि, प्लॉट क्र. २३३/२३४, सेक्टर-२१, नेरुळ (पुर्व), नवी मुंबई ४००७०६. | १ | १ | सी-१ | होय |
| ७ | नेरुळ विभाग | २०१९-२० | १ | पंचशिल अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, (बिल्डिंग नं. १ ते १७) १७ इमारती (एन.एल. २, टाईप, से.१ए, शिवाजी चौक, नेरूळ, नवी मुंबई) | १ | १७ | सी-१ | होय |
| ८ | | २०२२-२३ | १ | श्रीनाथजी सदन को. ऑप. हौ. सोसा. लि., भुखंड क्र. ५२, से. ०६, (G+3) नेरूळ नवी मुंबई - ४०० ७०६. | २ | १ | सी-१ | नाही |
| ९ | | | २ | सायलेंट व्हॅली अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, एन. एल. ५, बिल्डींग नं. २५ ते ३४, सेक्टर - ११, (G+2) नेरूळ, नवी मुंबई - ४००७०६. | | १० | सी-१ | होय |
| १० | | २०२३-२४ | १ | कॉस्मोपॉलिटन सोसायटी - II, पुनित पार्क, प्लॉट नं. १८२ - सी, सेक्टर- १७, नेरूळ (प), नवी मुंबई. (G + 7 stories ) A, B, C & D Wing | २ | ४ | सी-१ | होय |
| ११ | | | २ | नंदनवन को. ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर- १७, प्लॉट नं.८४, (G+2) नेरूळ, नवी मुंबई - ४०० ७०६ | | १ | सी-१ | नाही |
| १२ | | २०२५-२६ | १ | शिवनेरी को. ऑप. हौ. सोसायटी लि. एन एल - ५, बिल्डींग नं. १, २ & ३, प्लॉट नं. १, सेक्टर- ३, नेरुळ, नवी मुंबई- ४००७०६. | १ | ३ | सी-१ | होय |
| १३ | | | २ | बादामी सदन, प्लॉट नं ०३, शिरवणे, सेक्टर-०१, नेरूळ, नवी मुंबई- ४००७०६. | १ | १ | सी-१ | नाही |
| १४ | वाशी विभाग | २०१७-१८ | १ | लिटिल फ्लॉवर को. ऑप. हौ.सो. लि जेएन-४ टाईप (बिल्डिंग नं. ९) से. ९ वाशी | १ | १ | सी-१ | होय |
| १५ | | २०२१-२२ | १ | नुर को ऑप हौ सो लि, प्लॉट नं -१८, सेक्टर-०९ ऐ, वाशी, नवी मुंबई. | १ | १ | सी-१ | होय |
| १६ | | | २ | सी १ व सी २ टाईप, बिल्डींग नं-१ ते १२, सेक्टर-०२, वाशी, नवी मुंबई. | २ | १२ | सी-१ | होय |
| १७ | | | ३ | सुमंगल अपार्टमेट, बी-३ (ळळ) टाईप ओनर्स असोसीएशन, भु. क्र. ६, सेक्टर- ३, वाशी, नवी मुंबई. | | १० | सी-१ | होय |
| १८ | | २०२२-२३ | १ | प्लॉट नं. ५८, सेक्टर- १२, वाशी, नवी मुंबई- ४००७०३, (G+3) | १ | १ | सी-१ | नाही |
| १९ | | २०२४-२५ | १ | अष्टविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, बिल्डींग नं. २९ ते ३६, बी-३ टाईप, भुखंड क्र. ८३ए, सेक्टर - १५, वाशी नवी मुंबई- ४००७०३. | १ | ८ | सी-१ | होय |
| २० | | २०२५-२६ | १ | डी- टाईप अपार्टमेंट ओनर्स असोशिएशन, इमारत क्र. डी-१ ते डी - ४, सेक्टर- १, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. | १ | ४ | सी-१ | नाही |
| २१ | | २०१५-१६ | १ | मॅफको मार्केट, भु.क्रं. ७९६, से.१८, तुर्भे, नवी मुंबई | २ | १ | सी-१ | नाही |
| २२ | तुर्भे विभाग | | २ | कांदा बटाटा मार्केट, से- १८, तुर्भे, नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| २३ | | २०१६-१७ | १ | ओमकार को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., से. २६, (ए-१ ते ए-२०), वाशी | ८ | २० | सी-१ | होय |
| २४ | | | २ | महाराष्ट्र को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सी-८८ ते सी- १०५, इमातरीच्या वर, शिवनेरी नगर, सेक्टर - २६, वाशी- (बिल्डींग नं. ६५ ते ११५ ) | | ५० | सी-१ | होय |
| २५ | | | ३ | हॅपी होम को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., सेक्टर-२६, वाशी, (बिल्डींग नं. D / ११६ ते D/१३९) | | २३ | सी-१ | होय |
| २६ | | | ४ | प्रगती को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., ई-ब्लॉक, से. २६, वाशी, (बिल्डींग नं. E- १४० ते E - १६१) | | २१ | सी-१ | होय |
| २७ | | | ५ | वसंत विहार सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादीत), कंडोनियम एफ, से. २६, वाशी (बिल्डींग नं. F - १६२ ते F-१८३) | | २१ | सी-१ | होय |
| २८ | | | ६ | प्रितीसंगम को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., शिवनेरी नगर, से. २६, वाशी (बिल्डींग नं. G - १८४ ते G-२०५) | | २१ | सी-१ | होय |
| २९ | | | ७ | वैभव को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., शिवनेरी नगर, से. २६, वाशी (बिल्डींग नं. H - २०६ ते H-२२५) | | १९ | सी-१ | होय |
| ३० | | २०१९-२० | ८ | चिंतामणी को. ऑप. हौ. सोसायटी लि. (बी-२१ ते बी-६४), सेक्टर क्र. २६, वाशी, नवी मुंबई | | ४३ | सी-१ | होय |
| ३१ | | २०१९-२० | १ | अमोली को. ऑप. हौ.सो.लि. भु. क्र. २८, से. ३०, सानपाडा रेल्वे स्टेशन जवळ (उत्तर), नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| ३२ | | २०२१-२२ | १ | विकास टप्पा- २, मार्केट -१ ( मसाला मार्केट) येथील मध्यवर्ती इमारत, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, से.१९, तुर्भे, नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| ३३ | | २०२२-२३ | १ | इमारत क्र. F - १ ते F- ४, पार्क व्हिव सोसायटी भुखंड व कंडोनिअम क्र. ६, सेक्टर- ७, सानपाडा, नवी मुंबई. | १ | ४ | सी-१ | होय |
| ३४ | | २०२२-२३ | १ | श्री. विनायक सोसायटी, भु. क्र. १, से. ५, (G+३)सानपाडा, तुर्भे नवी मुंबई - ४००७०५. | १ | २ | सी-१ | होय |
| ३५ | | २०२३-२४ | १ | कस्तुरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, भुखंड क्र. २, सेक्टर- ४, सानपाडा, नवी मुंबई. | १ | १ | सी-१ | होय |
| ३६ | | २०२५-२६ | १ | साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, इमारत नं. बी- ७ ते १२, भुखंड क्र. ११, सेक्टर-१०, सानपाडा, नवी मुंबई - ४००७०५ | १ | ६ | सी-१ | होय |
| ३७ | कोपरखैरणे विभाग | २०१७-१८ | १ | गगनगिरी को. ऑप हौ. सोसायटी लि, कंडोनियम क्र. ०२, सी टाईप, इमारत क्र. १ ते १३, सेक्टर ९, कोपरखैरणे | २ | १३ | सी-१ | होय |
| ३८ | | | २ | मे. चंद्रलोक को. ऑप. हौ.सो.लि., भुखंड क्र. ७, कंडोनियम क्र.०७, सेक्टर १०, कोपरखैरणे | | ४७ | सी-१ | होय |
| ३९ | | २०२१-२२ | १ | प्लाझा को. ऑप. हौसिंग सोसायटी, भुखंड क्र. ६९, से. २, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९. | २ | १ | सी-१ | नाही |
| ४० | | | १ | स्पोर्टस अरेना को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. भु. क्र. ६७, से.२, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९ | | १ | सी-१ | नाही |
| ४१ | | २०२२-२३ | १ | सिल्व्हर सॅन्ड, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, भु. क्र. बी-६२ ते बी-६५, (G+4) से. १९, कोपरखैरणे, नवी मुंबई- ४०० ७०९. | ३ | १ | सी-१ | नाही |
| ४२ | | | २ | त्रिदल एक्स-सर्व्हिसमेन, को. ऑप. हौसिंग सोसायटी, लि. भु. क्र. ६, सेक्टर- २०, (ग्रह+३) कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. | | १ | सी-१ | नाही |
| ४३ | | | ३ | सिल्व्हर नेस्ट को. ऑप. हौ. सोसायटी लि., भु.क्र.८९, से.१५, (ग्रह+३), कोपरखैरणे नवी मुंबई- ४००७०९ | | १ | सी-१ | होय |
| ४४ | | २०२५-२६ | १ | सिटी शाईन को. ऑप. हौ. सोसा.लि. प्लॉट नं. १४. सेक्टर- २. कोपरखैरणे. नवी मुंबई | १ | | सी-१ | होय |
| ४५ | | | २ | राज पॅलेस को. ऑप. हौ. सोसा. लि. प्लॉट नं. १६, सेक्टर- २, कोपरखैरणे, नवी मुंबई- ४००७०९. | १ | ३ | सी-१ | होय |
| ४६ | | | ३ | श्री. श्याम को - ऑप हौ. सोसायटी, प्लॉट नं. ४१, सेक्टर-१, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९. | १ | १ | सी-१ | नाही |
| ४७ | घणसोली विभाग | २०१६-१७ | १ | श्री. दत्ता मधुकर पाटील भवानी मंदिराशेजारी, कालआळी, घणसोली नवी मुंबई | १ | १ | सी-१ | नाही |
| ४८ | | २०२४-२५ | १ | घणसोली, रबाळे, शाळा क्र. ५५, कातकरीपाडा समाजमंदिर, घणसोली नवी मुंबई. | १ | १ | सी-१ | नाही |
| ४९ | ऐरोली विभाग | २०१५-१६ | १ | श्री. प्रकाश नामदेव नाईक व इतर घर क्र. ५२, दिवागांव, ऐरोली. | २ | १ | सी-१ | नाही |
| ५० | | | २ | श्री. अशोक आर. शुक्ला, रो. हा. क्र. बी-०१ व बी - ०२, गणेशबाग, को. ऑप. हौ. सोसा., लि., प्लॉट नं. १, सेक्टर - ०१ | | १ | सी-१ | नाही |
| ५१ | | २०२५-२६ | १ | सहजीवन अपार्टमेंट, ओनर्स असोसिएशन, टाईप एएल-४, इमारत क्र. १ ते ११, सेक्टर- १६, सिडको कॉलनी, ऐरोली, नवी मुंबई - ४०० ७०८. | १ | ११ | सी-१ | होय |
| ५२ | दिघा विभाग | २०१६-१७ | १ | खंडू कोळी चाळ, दिघा पुर्व, (DIG - DIG - 0022), दिघा, नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| | | | | | ५२ | ३७६ | ५२ | ० |

उपरोक्त धोकादायक इमारतींच्या वर्गीकरणानुसार इमारती भोगवटा वापर / रहिवास करणा-यांनी इमारती तात्काळ निष्कासित करावयाच्या आहेत. किंवा वर्गीकरणानुसार इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणा-या भोगवटा धारकांनी इमारती दुरूस्ती करून आवश्यक उपाय योजना करणे अगत्याचे आहे. अन्यथा धोकादायक परिस्थिती उदभवल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सही/-
( डॉ. कैलास शिंदे ) आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र.नमुंमपा / जनसंपर्क / जाहिरात / ३६३ / २०२६
दिनांकः- ०८/०५/२०२६

# 'ऐरोली-काटई फ्री-वे'चे उर्वरित काम दृष्टीपथात

## उर्वरित कामासाठी लागणाऱ्या जागेच्या संपादनाची प्रक्रिया सुरु

**कल्याण** : मुंबईच्या मुक्त मार्गाच्या (फ्री वे) धर्तीवर उभारण्यात येत असलेला आणि नवी मुंबई ते डोंबिवली अंतर काही मिनिटांवर आणणाऱ्या ऐरोली काटई मुक्त मार्गाच्या उभारणीतील कोंडी लवकरच फुटणार आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील या मार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक जागेच्या उपलब्धतेसाठी भूसंपादन अधिकाऱ्यांनी नोटीस जाहीर केले आहे. 'कल्याण'चे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने साकारण्यात येत असलेल्या या प्रकल्पामुळे डोंबिवली ते नवी मुंबई अंतर अवघ्या १०ते १५ मिनिटात पार करता येणार आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने मतदारसंघातील वाहतूक जलद व्हावी यासाठी अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. मेट्रो-१२, मेट्रो-५ आणि मेट्रो-५चा उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर तसेच टिटवाळापर्यंत विस्तार, विविध महत्वाचे उड्डाणपुल, रेल्वे उड्डाणपुल, सॅटिस यासारखे अनेक मेगा प्रकल्प कल्याण लोकसभा मतदारसंघात राबविण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर खासदार डॉ. शिंदे त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कल्याण-डोंबिवली ते नवी मुंबई असे अंतर

पुढच्या टप्प्यातील कामासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने या मार्गाचे काम रखडले होते. ठाणे महापालिकेच्या क्षेत्रात येणाऱ्या या भागातील भूसंपादन करुन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे अनेक महिन्यांपासून प्रयत्नशील होते. अखेर या मार्गात आवश्यक जागेचे भूसंपादन करण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून नोटीस जाहीर करण्यात आली आहे. यात आवश्यक जागेचा तपशील आणि गावांच्या नावांची माहिती देण्यात आली आहे. सध्याच्या घडीला सदर जागा खुली आहे, त्यामुळे कोणत्याही भूखंडधारकाचे यात विस्थापन होणार नाही. तसेच पुनर्वसन किंवा पुनर्वसाहतीचाही प्रश्न उद्भवत नाही. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यास ऐरोली ते काटई मार्गाच्या उभारणीला गती मिळेल.

### खा. श्रीकांत शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रकल्पाला गती

कमी करण्यासाठी 'एमएमआरडीए'च्या माध्यमातून ऐरोली ते काटई फ्री-वेची निर्मिती केली जाते आहे.

या मार्गात ऐरोली भागातील खाडीपासून सदर मार्गाची सुरूवात होते. तर सदरचा मार्ग डोंबिवलीजवळी काटई चौकात येऊन उतरणार आहे. सदर मार्ग पूर्णपणे उन्नत असून तो शिळफाटा येथील डोंगरातून ऐरोलीला जातो. यातील बोगदा तयार असून ऐरोली दिशेच्या बहुतांश भागाचे काम पूर्ण झाले आहे. तर मुंब्रा वाय जंक्शन पुलावरुन या रस्त्याची मार्गिका जाते. बोगदा आणि बोगद्यातून येणारा मार्ग मुंब्रा वाय जंक्शन पुलावर येऊन थांबला आहे.

ऐरोली-कटाई नाका कॉरिडॉर 'एमएमआरडीए'च्या एकात्मिक, भविष्यासाठी सज्ज पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टिकोनात परिवर्तन घडवून आणण्यास सज्ज आहे. प्रमुख शहरी केंद्रांमध्ये लक्षणीयरित्या जलद, सुरक्षित आणि अधिक कार्यक्षम प्रवास शक्य करुन सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील वाहतुकीच्या पध्दतींना नव्याने आकार देणार आहे, प्रमुख शहरांना जवळ आणणार आहे आणि प्रादेशिक वाहतूक अधिक सुलभ करणार आहे. सदर प्रकल्प कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक घडामोडींसाठी एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ म्हणून काम करेल. तसेच लाखो लोकांचा दैनंदिन प्रवास अधिक वेगवान करेल.



**ऐरोली-काटई रस्त्याच्या उभारणीसाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याबाबत नुकतेच नोटीस जाहीर करत माहिती देण्यात आली आहे. ऐरोली-काटई मुक्त मार्गाच्या उर्वरित भागाच्या उभारणीसाठी १८.३३ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येत आहे. यामध्ये देसाई गावातील १०.३ हेक्टर, डावले ४.९२ हेक्टर, शीळ २.१२ हेक्टर, कौसा ०.५७ हेक्टर, डोखाळ ०.४२ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे.**

# ठाणे जिल्हा 'ड्रग्ज फ्री' करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्र यावे - डॉ. संदीप माने

**ठाणे** : ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी केवळ एका विभागाने नाही, तर सर्वच शासकीय विभागांनी समन्वयाने आणि प्रभावीपणे काम करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित 'जिल्हा नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर' समितीच्या बैठकीत डॉ. माने बोलत होते.



या बैठकीत डॉ. संदीप माने यांनी पोलीस, महसूल, आरोग्य आणि उत्पादन शुल्क विभागाला स्पष्ट निर्देश दिले की, अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी या सर्व यंत्रणांनी एकमेकांशी माहितीची देवाण-घेवाण करुन संयुक्त कारवायांचा वेग वाढवावा. तस्करीच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर द्यावा.

अंमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचविण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये जनजागृती मोहिमांचे काटेकोर नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील व्यसनमुक्ती केंद्रांना आवश्यक ते तांत्रिक सहकार्य आणि मार्गदर्शन प्रशासनामार्फत उपलब्ध करुन दिले जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

सदर बैठकीला ठाणे शहर पोलीस उपअधीक्षक भोसले, पोलीस निरीक्षक राजेंद्र निकम, समीर शेख, सहायक पोलीस निरीक्षक लहू सातपुते यांच्यासह औद्योगिक सुरक्षा, अन्न-औषध प्रशासन, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद समाज कल्याण, कृषी, केंद्रीय वस्तू-सेवा कर (जीएसटी), टपाल आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थमुक्त करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने उचललेले एक निर्णायक पाऊल असून, भविष्यातील रणनीतीवरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# अग्निशमन दलाची गाडी नाल्यात अडकली

**कल्याण** : वादळी वाऱ्यांमुळे कल्याणमध्ये अनेक ठिकाणी झाडे कोसळली असून, रस्ते मोकळे करण्याचे प्रयत्न सुरु होते. मात्र, अरुंद रस्ते आणि जुन्या भागातील अतिक्रमणांमुळे बचावकार्यात अडथळा आला. यावेळी झाड हटवण्यासाठी निघालेली अग्निशमन दलाची गाडी टिळक चौक परिसरातील नाल्याच्या झाकणात अडकली.

गाडी बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना मोठी कसरत करावी लागली. अखेरीस जेसीबीच्या मदतीने गाडी नाल्यातून यशस्वीपणे बाहेर काढण्यात आली. या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, आपत्कालीन परिस्थितीत शहराच्या रस्ते नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



# बेघर निवारा केंद्राला आयुक्तांची भेट

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिका संचालित घणसोली येथील बेघर निवारा केंद्राला आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी भेट देत तेथील व्यवस्थेची पाहणी केली. सदर ठिकाणी असलेल्या बेघर स्त्री, पुरुष नागरिकांशी संवाद साधत आयुक्तांनी उपलब्ध सुविधांमध्ये वाढ करण्याचे निर्देश दिले.



याप्रसंगी आयुक्तांसमवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, समाजविकास विभागाचे उपायुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपायुक्त डॉ.अजय गडदे, उद्यान विभाग उपायुक्त स्मिता काळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्तांनी महिला आणि पुरुष कक्षामधील बेघर नागरिकांशी संवाद साधत त्यांची आस्थेने विचारपूस केली. त्यांच्या खानपान व्यवस्थेचीही पाहणी केली. तसेच त्यांची आरोग्य तपासणी वेळेच्या वेळी केली जात असल्याबद्दल माहिती घेतली.

याठिकाणी असलेल्या बेघर व्यक्तींना त्यांच्या आवडीनुसार विविध कलागुण जोपासण्याच्या दृष्टीने शिलाईकाम तसेच कलाकुसरीच्या कामाची संधी उपलब्ध करुन द्यावी. तसेच वाचण्यासाठी पुस्तकांची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले. निवारा केंद्राच्या दर्शनी भागात पावसाळ्यापूर्वी शेड तयार करुन घ्यावा. तसेच बसण्यासाठी बेंच उपलब्ध करुन द्यावेत, अशाही सूचना त्यांनी केल्या. बेघरांची संख्या लक्षात घेऊन आणखी केंद्र सुरु करण्याबाबत तपासणी करण्याची सूचना आयुक्तांनी यावेळी केल्या.

# सभापती पदी बिना फुट्यार्डो, निलेश देशमुख; उप-सभापती पदी सुवर्णा पाटील, निशाद चोरघे यांची निवड

**वसई** : वसई-विरार शहर महापालिका महिला-बालकल्याण समिती तसेच आरोग्य समितीच्या सभापती आणि उप-सभापती पदासाठीची निवड करण्यासाठी विशेष बैठक ८ मे रोजी महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये पीठासीन अधिकारी तथा 'पालघर जिल्हा परिषद'चे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, नगरसचिव विश्वनाथ तळेकर तसेच महिला-बालकल्याण समिती आणि आरोग्य समिती सदस्य उपस्थित होते.



महिला-बालकल्याण समिती सभापती पदासाठी बिना फुट्यार्डो आणि सान्वी यंदे यांनी तर उपसभापती पदासाठी मीरा निकम आणि सुवर्णा पाटील यांनी आपले नामनिर्देशनपत्र सादर केले होते. त्याचप्रमाणे आरोग्य समिती सभापती पदासाठी डॉ.योगिता करंजकर आणि निलेश देशमुख यांनी तर उप-सभापती पदासाठी जितेश राऊत आणि निशाद चोरघे यांनी नामनिर्देशनपत्र सादर केले होते.

यानंतर सभापती-उपसभापती पदासाठी मतदान प्रक्रिया घेण्यात आली. उपस्थित सदस्यांनी यावेळी हात वर करुन आपले मत दिले. यात बिना फुट्यार्डो यांना ९ मते तर सान्वी यंदे यांना ५ मते मिळाली. त्यानुसार बिना फुट्यार्डो या सभापती पदी बहुमताने निवडून आल्या. तर उप-सभापती पदाच्या निवडणुकीत सुवर्णा पाटील (९ मते) यांनी मीरा निकम (५ मते) यांचा पराभव केला. तसेच आरोग्य समिती सभापती पदाच्या निवडणुकीत निलेश देशमुख यांनी (९ मते) तर डॉ. योगिता गवळी-करंजकर (६ मते) यांचा पराभव केला. या समितीच्या उप-सभापती पदाच्या निवडणुकीत निशाद चोरघे (९ मते) यांनी जितेश राऊत (६ मते) यांचा पराभव केला.

सभापती आणि उपसभापती पदासाठी विजयी उमेदवारांच्या नावाची घोषणा पीठासन अधिकारी मनोज रानडे यांनी केली. यानंतर सभापती बिना फुट्यार्डो आणि निलेश देशमुख तर उप-सभापती सुवर्णा पाटील आणि निशाद चोरघे यांचे महापालिका अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, नगरसचिव विश्वनाथ तळेकर तसेच इतर सदस्यांनी अभिनंदन केले.

# तळोजामध्ये इमारतीत आग; शीघ्र कृती दलामुळे मोठी दुर्घटना टळली

**खारघर** : तळोजा फेज-२ परिसरातील इम्पीरियल क्रेस्ट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमध्ये ८ मे रोजी सकाळी इलेक्ट्रिक डक्टला भीषण आग लागल्याची घटना घडली. सकाळी ७.३०च्या सुमारास सदर घटना घडली. आग भूतळापासून थेट चौदाव्या मजल्यापर्यंत पसरल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, १०२ शीघ्र द्रुत कृती दलाचे जवान तसेच अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली असून कोणतीही जीवितहानी झाली नाही.



मिळालेल्या माहितीनुसार तळोजा फेज-२ मधील इम्पीरियल क्रेस्ट सोसायटी शीघ्र कृती दलाच्या कॅम्पसजवळ आहे. तळोजा वसाहत मधील एका टॉवरमध्ये आग लागल्याची माहिती मिळताच सहाय्यक कमांडंट आदर्श एम. बी. यांच्या नेतृत्वाखाली क्विक ॲक्शन टीममधील १६ जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी जवानांनी पाण्याचा टँकर तसेच अग्निशमन साहित्य वाहनासह बचावकार्य सुरू केले. शीघ्र कृती दलाच्या जवानांनी सर्वप्रथम सोसायटीतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने आग विझविण्याचे कार्य हाती घेण्यात आले.

इलेक्ट्रिक डक्टमधून मोठ्या प्रमाणात धूर पसरल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, जवानांच्या शिस्तबध्द आणि धाडसी कार्यवाहीमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून केवळ काही प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. स्थानिक नागरिकांनी १०२ वी द्रुत कृती दल आणि अग्निशमन दलाच्या तत्पर आणि धाडसी कामगिरीचे कौतुक केले आहे.

# ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक; राजकीय हालचालींना वेग

**ठाणे** : ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची यंदाच्या वर्षीची निवडणूक जून अखेर लागण्याची शक्यता आहे. १४ मे रोजी अंतीम मतदार यादी जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना एकनाथ शिंदे गट सक्रीय झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि मित्रपक्षांनी या निवडणुकीसाठी कंबर कसली असून, बँकेवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी रणनीती आखली आहे.



ठाणे येथे नुकतीच या निवडणुकीच्या नियोजनासाठी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत 'भगवा फडकवण्याचा' निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, उपनेते प्रकाश पाटील, रंभाजी पाटील, अरुण पानसरे, पंडित पाटील, हनुमान जगदाळे, जानकर, आर.सी. पाटील, अनिल मुंबैकर, सर्जेराव शिंदे आणि इतर उपस्थित होते. या बैठकीत इच्छुकांची मोठी गर्दी आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला.

ठाणे आणि पालघर या दोन जिल्ह्यांतील कार्यक्षेत्र असलेल्या या बँकेसाठी २१ जागांवर निवडणूक होणार आहे. यात सेवा सोसायट्या (प्रत्येक तालुक्यात एक)१३ जागा, जिल्हा स्तर (ओपन) ८ जागा, विशेष प्रवर्ग (ओबीसी) १ जागा, महिला प्रतिनिधी २ जागा (अंदाजित), इतर (पतसंस्था, हाऊसिंग सोसायटी) समाविष्ट असतील.

# वऱ्हाळ तलावाकडे महापालिकेचे दुर्लक्ष

**नगरसेवक काटेकर यांचा इशारा**

**भिवंडी** : भिवंडी शहराला ५ एमएलडी पाणीपुरवठा करणारा शहरातील पर्यटन क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाळ तलावाची दुरवस्था झाली असून त्याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने कामतघर ग्रामस्थ वऱ्हाळ तलाव ताब्यात घेतील, असा इशारा स्थानिक नगरसेवक मनोज काटेकर यांनी महासभेत दिला आहे.

वऱ्हाळ देवी मंदिराशेजारील तलावाला धार्मिक अधिष्ठान असून या तलावातून १९६५ पासून २ एमएलडी पाणी पुरवठा केला जात होता. त्यामध्ये वाढ करुन ५ एमएलडी पाणी पुरवठा केला जात होता. पण, पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झाल्याने 'राष्ट्रीय हरित लवाद'ने येथील पाणी पिण्यायोग्य नसल्याचा निर्वाळा दिल्याने येथील पाणी उपसा बंद झाला आहे. तर संपूर्ण तलावाच्या पाण्यावर हिरवा तवंग पसरल्याने दुर्गंधी पसरली आहे.

अशा परिस्थितीमध्ये पाण्याच्या स्वच्छतेकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने स्थानिक नगरसेवक 'शिंदे सेना'चे गटनेते मनोज काटेकर यांनी महासभेत सदर मुद्दा उपस्थित केला. महपालिका तलावाकडे दुर्लक्ष करणार असेल तर सदर तलाव कामतघर ग्रामस्थ ताब्यात घेतील, असा त्यांनी इशारा दिला. जिल्ह्यातील एकाही महापालिकेकडे पाणी पुरवठ्यासाठी स्वत:चा तलाव नसताना भिवंडी महापालिका एकमात्र आहे, ज्यांच्याकडे असा पाणीसाठा आहे . या तलावामधून शहरवासीयांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तलावातील पाणी हिरवेगार झाले असून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याचा आरोप करण्यात आला.

कामतघर ग्रामपंचायतीच्या काळात स्थानिक नागरिक तलावात मासेमारी करत होते.१९८२ मध्ये नगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर तलावाचा ताबा पालिकेकडे गेला.पण वीस वर्षांपूर्वी बनवलेले संरक्षक कठडे सुद्धा तुटले आहेत.पण तलाव संवर्धनासाठी पालिकेकडून कोणताही ठोस खर्च केला जात नसल्याची टीका मनोज काटेकर यांनी केली असून मनपा लक्ष देत नसेल तर तलावाचा ताबा घेऊन त्याची स्वच्छता व निगा राखू असा इशारा देत त्यामधून मासेमारीचे उत्पन्न मिळवून पालिकेस सुद्धा उत्पन्न मिळवून देऊ असे स्पष्ट केले आहे.

# महापालिका कर्मचाऱ्यांचा गौरवपूर्ण सत्कार




**भाईंदर** : मिरा-भाईंदर महापालिका रौप्य महोत्सवी वर्ष समितीद्वारे कामगार दिनाचे औचित्य साधून महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सन्मान करण्याच्या उद्देशाने सदर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

महापालिकेच्या स्वच्छता सेवा, आरोग्य विभाग, जलपुरवठा व्यवस्था, पायाभूत सुविधा विकास, प्रशासनिक सेवा तसेच विविध नागरी सुविधांच्या प्रभावी अंमलबजावणीत कर्मचाऱ्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल यावेळी विशेष गौरव करण्यात आला. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी सातत्याने केलेल्या परिश्रमांची दखल घेत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी आमदार नरेंद्र मेहता आणि महापौर डिंपल मेहता यांच्या शुभहस्ते कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेमुळे महापालिकेच्या विकासकामांना गती मिळाल्याचे नमूद करण्यात आले. तसेच नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या निष्ठा, जबाबदारी आणि सेवाभावाचे विशेष कौतुक करण्यात आले.

रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश करत असताना महापालिकेच्या प्रगतीमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या सन्मानामुळे त्यांच्या मनोबलात वाढ होऊन शहराच्या विकासासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सदर कार्यक्रमास महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि विविध विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विकसित, स्वच्छ आणि सक्षम मिरा-भाईंदर घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

**'दैनिक आपलं नवे शहर'** हे दैनिक वृत्तपत्र **'कैलाशचंद्र प्रकाशन'** तर्फे **प्रकाशक - शिव कैलाश गिंदोडीया** यांनी 'दैनिक आपलं नवे शहर कार्यालय', १३१४, तेरावा मजला, रियल टेक पार्क, प्लॉट नंबर-३९/२, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई -४००७०३ येथून, **मालक-मुद्रक - कैलाश शंकरलाल गिंदोडीया, संपादक - शैलेश सुंदर जाधव** यांनी श्रीमती मनाली तुषार खानविलकर यांच्या सिध्दकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन प्रा. लि., प्लॉट नंबर-डब्लू-२३०, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे मुद्रित करुन प्रसिध्द केले.
• **RNI No.- 61792/94** • **ABC Certificate no. 133/2105** • **Tel. :** 022- 2781 5380 • **Email :** contact@naveshahar.com • www.naveshahar.com, Post.Reg.:NMB/136/2024-2026/Vashi MDG P.O.